


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३८ ■ रविवार, दि.८ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# इस्रायलने इराणच्या तेल साठ्यांवर क्षेपणास्त्र डागले



## ३ डेपो व ३० इंधन टँक उद्ध्वस्त
## इराणने ५ देशांवर हल्ले केले

वृत्तसंस्था ८ मार्च

**तेहरान :** अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्ध नवव्या दिवशी प्रवेश करत आहे. दरम्यान, इस्त्रायलने इराणमधील तेल साठवणूक आणि रिफायनरी सुविधांवर हवाई हल्ले सुरू केले आहेत. इस्त्रायली माध्यम विनीतच्या मते, ३० इराणी इंधन टाक्या आणि तीन तेल डेपो लक्ष्य करण्यात आले आहेत.दरम्यान, इराणने इस्त्रायल, कुवेत, सौदी अरेबिया, बहरीन आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) यासह पाच देशांवर हल्ला करून प्रत्युत्तर दिले. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) ने म्हटले आहे की ते अमेरिका आणि इस्त्रायलविरुद्ध सहा महिने युद्ध लढण्यास सक्षम आहेत.

आयआरजीसीचे प्रवक्ते अली मोहम्मद नैनी म्हणाले की इराणी सैन्य आणि रिव्होल्यूशनरी गार्ड दोघेही दीर्घकाळ संघर्ष करण्यास सक्षम आहेत. त्यांनी असाही दावा केला की मध्य पूर्वेतील अमेरिका आणि इस्त्रायली लष्करी तळ आणि सुविधांशी संबंधित २०० हून अधिक लक्ष्यांना लक्ष्य करण्यात आले आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी सांगितले की, इराण आपल्या शेजारील देशांसमोर झुकला आहे. त्यांनी ही गोष्ट त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'ट्रुथ सोशल'वर लिहिली.ट्रम्प यांनी दावा केला की, इराणने शेजारील देशांची माफी मागितली आहे आणि वचन दिले आहे की आता त्यांच्यावर हल्ला करणार नाही. त्यांच्या मते, हे अमेरिका आणि इस्त्रायलच्या सततच्या हल्ल्यांच्या दबावामुळे झाले आहे.ट्रम्प म्हणाले की, इराण आता मध्यपूर्वेचा दादागिरी करणारा नाही, तर 'लूजर' बनला आहे. ही परिस्थिती तोपर्यंत राहू शकते जोपर्यंत इराण शरणागती पत्करत नाही किंवा पूर्णपणे कमकुवत होत नाही.खरं तर, इराणचे अध्यक्ष मसूद पेजेशकियन यांनी अलीकडेच आपल्या शेजारील देशांवर केलेल्या हल्ल्याबद्दल माफी मागितली होती. ते म्हणाले होते की, आता शेजारील देशांवर तोपर्यंत हल्ले केले जाणार नाहीत, जोपर्यंत त्या देशांच्या भूमीतून इराणवर कोणताही हल्ला केला जात नाही.



### इराण युद्धाचे मोठे अपडेट्स

- इराणमध्ये आतापर्यंत ६,६६८ नागरी भागांना लक्ष्य करण्यात आले आहे.
- या हल्ल्यांमध्ये ५,५३५ घरे आणि १०४१ दुकानांचे नुकसान झाले.
- १४ वैद्यकीय केंद्रे आणि ६५ शाळांवरही हल्ला करण्यात आला.
- अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धात आतापर्यंत १४८३ लोकांचा मृत्यू झाला आहे.
- रेड क्रिसेंटची १३ केंद्रेही हल्ल्यांना बळी पडली.
- ही माहिती इराणच्या रेड क्रिसेंट सोसायटीने दिली आहे.
- युद्धात आतापर्यंत इस्त्रायलचे १७६५ लोक जखमी झाले आहेत.

# जय पवार यांची उद्या पत्रकार परिषद

प्रतिनिधी ८ मार्च



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर आता अजित पवार कुटुंबातील सदस्य प्रथमच जाहीरपणे आपली भूमिका मांडणार आहेत. अजितदादांचे सुपुत्र जय पवार उद्या (९ तारीख) पत्रकार परिषद घेणार असून, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. यापूर्वी जय पवार यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली होती, मात्र आता ते प्रत्यक्ष माध्यमांसमोर येत असल्याने चर्चांना उधाण आले आहे. जय पवार या अपघाताबाबत कोणती भूमिका मांडतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

जय पवार यांनी यापूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून तपासावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. विमान अपघातात 'ब्लॅक बॉक्स' इतक्या सहजपणे नष्ट होऊ शकत नाही, असा दावा त्यांनी केला होता. या अपघाताचे 'निर्विवाद सत्य' बाहेर आलेच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. अ्उर्णे ला उद्देशून केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी त्र्एं कंपनीची सर्व विमाने तात्काळ 'ग्राउंड' करण्याची आणि रोहित सिंह यांना अटक करण्याची मागणी केली होती. ही 'एका मुलाची आर्त हाक' असल्याचे त्यांनी म्हटले होते.

# सरकारने घरगुती गॅस बुकिंगचे नियम बदलले

प्रतिनिधी ८ मार्च

**मुंबई :** इस्त्रायल इराण युद्धादरम्यान जागतिक तणावाची परिस्थिती लक्षात घेता घरगुती गॅस सिलिंडर बुक करण्याच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. बुकिंगचा कालावधी १५ दिवसांवरून २१ दिवसांपर्यंत वाढवण्यात आला आहे, म्हणजेच एका सिलिंडरच्या डिलिव्हरी आणि दुसऱ्या सिलिंडरच्या डिलिव्हरीमध्ये २१ दिवसांचे अंतर असेल. हा नवीन नियम लागू करण्यासाठी एजन्सींचे सॉफ्टवेअर तात्काळ अपडेट करण्यात आले आहे.पण बुकिंग प्रक्रिया पहिल्यासारखीच राहणार. ग्राहक पुढील सिलिंडर मिळाल्यानंतर लगेच बुक करू शकतात. पण मंत्रालय २१ दिवसांनंतरच बुकिंग करण्याची परवानगी देण्याचा विचार करत आहे. जर हा नवीन नियम लागू झाला, तर आधीच्या सिलिंडरचा २१ दिवसांचा कालावधी संपल्यानंतरच तुम्हाला पुढील सिलिंडर बुक करण्याची परवानगी दिली जाईल.तेल कंपन्यांनी घरगुती गॅस सिलिंडरसाठी आधीच काही नियम केले आहेत. या नियमांनुसार, प्रत्येक ग्राहक वर्षाला फक्त १२ अनुदानित सिलिंडर आणि तीन विना अनुदानित सिलिंडर खरेदी करू शकतो. परिणामी १ एप्रिल ते ३१ मार्च दरम्यान प्रत्येक गॅस कनेक्शनवर एकूण १५ सिलिंडर खरेदी करता येतील. पहिला सिलिंडर मिळाल्यानंतर २१ दिवसांनीच दुसरा सिलिंडर वितरित केला जाईल असा एक नवीन नियम लागू करण्यात आला आहे. एजन्सीचे सॉफ्टवेअर लॉक करून हे लागू करण्यात आले आहे. पण सिलिंडरची कमतरता नाही.

# महिला दिनाच्या पूर्वसंध्येला विधवा महिलेची गळा आवळून हत्या

प्रतिनिधी ८ मार्च

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन अंतर्गत एका विधवा महिलेचा गळा आवळून हत्या करण्यात आल्याची घटना जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी घडली. मृत महिलेचे नाव दीपाली असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच दीपालीच्या पतीचे निधन झाले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपाली भाड्याच्या घरात राहत होती. घर बदलताना सामान नेण्यासाठी तिला वाहनाची गरज होती, त्यादरम्यान तिची ओळख जमाल शाह ऊर्फ सलमान अजीज शाह नावाच्या व्यक्तीशी झाली. सुरुवातीला ही केवळ साधी ओळख होती, मात्र हळूहळू आरोपीचे दीपालीच्या घरी येणे-जाणे वाढले. दीपालीने आपल्या मुलांच्या भविष्यासाठी काही पैसे वाचवून ठेवले होते. आरोपी या पैशांची मागणी करू लागला होता, परंतु दीपालीने पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला.

### ♦ आरोपीला अकोटमधून अटक

वाचवून ठेवलेले पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपी जमाल शाह संतापला होता. रागाच्या भरात आरोपीने दीपालीवर हल्ला केला आणि तिचा गळा आवळून खून केला. गुन्हा केल्यानंतर आरोपी महिलेचा मोबाईल फोन घेऊन घटनास्थळावरून फरार झाला. खदान पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असता, पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये गळा आवळून हत्या झाल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांना माहिती मिळाली की, आरोपी अकोट येथे आपल्या बहिणीच्या घरी लपला आहे. पोलिसांनी सापळा रचून त्याला अकोटमधून अटक केली. या निर्घृण हत्याकांडामुळे परिसरात संतापाचे वातावरण असून, नागरिकांनी आरोपीला कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे. खदान पोलीस सध्या आरोपीची अधिक चौकशी करत असून घटनेच्या इतर पैलूंचा तपास सुरू आहे.

# अनिल अंबानींना सीबीआयचा दणका !

प्रतिनिधी ८ मार्च

### ♦ १०८५ कोटींच्या बँक घोटाळ्याप्रकरणी गुन्हा दाखल




**नवी दिल्ली :** देशातील प्रख्यात उद्योगपती आणि रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्यासमोरील अडचणी कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. पंजाब नॅशनल बँकेची १०८५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या तत्कालीन अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे उद्योग जगतात मोठी खळबळ माजली आहे.

पंजाब नॅशनल बँकेचे मुख्य व्यवस्थापक संतोषकृष्ण अण्णावरपू यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे सीबीआयने ही एफआयआर नोंदवली आहे. तक्रारीनुसार, २०१३ ते २०१७ या कालावधीत अनिल अंबानी यांनी रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून बँकेची मोठी फसवणूक केली. बँकेच्या दाव्यानुसार पंजाब नॅशनल बँक : ६२१.३९ कोटी रुपये, युनायटेड बँक ऑफ इंडिया: ४६३.८० कोटी रुपये (२०२० मध्ये या बँकेचे पीएनबीमध्ये विलीनीकरण झाले आहे). बँकेने आपल्या तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. रिलायन्स कम्युनिकेशन्सने कर्ज परत न करण्याच्या उद्देशानेच १०८५ कोटी रुपयांचे कर्ज घेतल्याचा दावा बँकांनी केला आहे. तसेच, ज्या कारणासाठी कर्ज घेण्यात आले होते, त्याऐवजी हा निधी जाणीवपूर्वक इतरत्र वळवण्यात आला.

# दुचाकी अपघातात दोघांचा मृत्यू, एक जखमी

प्रतिनिधी ८ मार्च

**खामगाव :** खामगाव-लोखंडा शिवार परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या दुचाकी अपघातातील दोघांचा उपचारादरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी मृत्यू झाला. दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोघे मृत्यूमुखी तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी हिवरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खामगाव येथील सतीफैल भागातील रहिवासी विनोद शामलाल सुसगोहर (५५) आणि त्यांचे मित्र उमेश जगन पवार (४५) ५ मार्च रोजी सकाळी सुमारे ९ वाजता दुचाकी क्रमांक एमएच २८ बीएच ६१९८ वरून लोखंडा शिवारातील लोखंडकार यांच्या ढाब्यावर साफसफाईच्या कामासाठी जात होते. सकाळी साडेनऊच्या सुमारास लोखंडकार ढाब्याजवळ राष्ट्रीय महामार्गावर समोरून येणाऱ्या एमएच २८ बीझेड ३२९९ क्रमांकाच्या दुचाकीने भरधाव वेगात येत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात विनोद सुसगोहर आणि मागे बसलेले उमेश पवार गंभीर जखमी झाले. नातेवाईकांनी त्यांना तातडीने खामगावच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही पुढील उपचारासाठी अकोला येथील जीएमसी रुग्णालयात हलविले. तेथे उपचारादरम्यान विनोद सुसगोहर व उमेश पवार यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दरम्यान, दुसऱ्या दुचाकीचा चालक रतन भानू कोळपे हाही गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातात दोन्ही दुचाकींचे मोठे नुकसान झाले आहे.

**CLASSIFIED**

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606
7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250
8788432278

# अकोल्याच्या तापमानाचा मार्चमध्येच उच्चांक !

### ♦ राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद, हवामान विभागाचा अलर्ट

प्रतिनिधी ८ मार्च



**अकोला :** राज्यात उन्हाचा चटका वाढू लागला असून विदर्भात तापमानाने चाळीशीचा टप्पा ओलांडला आहे. शनिवारी राज्यात अमरावतीचे तापमान सर्वाधिक होते तर आज अकोल्यातील तापमान ४०.८ नोंदवले गेले असून, त्यापाठोपाठ अमरावती ४०.६ अंशांवर पोहोचले आहे. त्यामुळे मार्च महिन्यातच तापमानाची उच्चांकी नोंद झाल्याने एप्रिल व मे मध्ये तापमान कसे राहिली, याची धास्ती नागरिकांनी घेतली आहे. अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंशांच्या पुढे गेल्याने उष्णतेची तीव्रता जाणवू लागली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. राज्यातील सर्वाधिक ४०.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद अकोल्यात झाली आहे. त्यापाठोपाठ अमरावती येथे ४०.६ अंश तर वर्धा जिल्ह्यात ४० अंश तापमान नोंदवण्यात आले. त्यामुळे मार्चच्या सुरुवातीलाच विदर्भात उन्हाचा तडाखा वाढू लागल्याचे चित्र दिसत आहे. राज्यातील इतर भागांतही तापमानात वाढ होताना दिसत आहे. पुणे (लोहगाव) येथे ३८.५ अंश तापमान नोंदवले गेले, तर जळगावमध्येही ३८.५ अंश तापमानाची नोंद झाली. नागपूरमध्ये ३७.८, वाशिममध्ये ३९.२, यवतमाळमध्ये ३८.४ आणि बुलडाण्यात ३७.२ अंश तापमान नोंदवले गेले. दरम्यान, गोंदिया येथे ३६.६ अंश तापमानाची नोंद झाली.

### यंदाचा उन्हाळा तीव्र होण्याची शक्यता

- हवामानातील बदलत्या परिस्थितीमुळे यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि वेगाने वाढणारे शहरीकरण यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत असून त्याचे परिणाम आता स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. जागतिक हवामान बदल निर्देशांकात भारताचा क्रमांक २३वा असून हवामान धोक्याच्या बाबतीत भारत जगात नवव्या स्थानावर आहे. मार्चच्या सुरुवातीलाच उष्णतेने उच्चांक गाठण्यास सुरुवात केल्याने यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# इराण बेचिराख करू : ट्रम्प यांचा इशारा

वृत्तसंस्था ८ मार्च



**वॉशिंग्टन :** पश्चिम आशियातील परिस्थिती आता निर्णायक वळणावर पोहोचली असून इराणच्या काही भागांचा पूर्ण विनाश होईल, असा हल्ला अमेरिका करणार असल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला. हा हल्ला इतका विध्वंसक असेल की यात बळींची संख्या वाढेल व प्रदेशही उद्ध्वस्त होईल, असे ट्रम्प यांनी विधान केले.

ट्रम्प यांची ही धमकी इराणचे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांच्या इशाऱ्यानंतर आली. पेझेश्कियान यांनी शनिवारी सकाळी सरकारी दूरचित्रवाणीवरून, अमेरिकेची बिनशर्त शरणागतीची मागणी हे एक त्यांचे स्वप्न असून ते त्यांनी आपल्यासोबत थडग्यात घेऊन जावे, असे वक्तव्य केले. त्यांनी अमेरिकेशी कोणत्याही परिस्थितीत चर्चा शक्य नसल्याचेही स्पष्ट केले. यात शुक्रवारी अमेरिकेचे कोषागार सचिव स्कॉट बेसेंट यांनी या युद्धातील आतापर्यंतची सर्वात मोठी बॉम्बफेक होणे अजून बाकी आहे, असल्याचे विधान केले आहे. दुसरीकडे इराणच्या हल्ल्यांची सुरुवात झाल्यापासून यूएईने आतापर्यंत २२१ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे शोधली. त्यापैकी २०५ नष्ट करण्यात यश आले. १४ समुद्रात पडली आणि २ यूएईच्या भूमीवर पडली. दुबई व कतारमध्ये रहिवाशांना त्यांच्या मोबाइलवर इराणकडून होणाऱ्या क्षेपणास्त्र हल्ला होणार असल्याचे धोक्याचे 'अलर्ट' दिले जात आहे.

### तेहरानवर तुफान हल्ले

इराणचे हल्ले रोखण्यासाठी सौदी अरेबियाचे संरक्षण मंत्री आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांची रियाधमध्ये भेट झाली. त्यांनी इराणच्या हल्ल्यांमुळे निर्माण झालेल्या गंभीर सुरक्षा परिस्थितीवर चर्चा केली, असे पाकिस्तानी लष्कराने म्हटले आहे.

### ५२,३६० भारतीय मायदेशी परतले

युद्धाच्या पार्श्वभूमीवर आखाती देशांतील विमान सेवेवर मोठा परिणाम झालेला असला तरी आतापर्यंत तेथून ५२ हजार ३६० लोकांना भारतात परत आणण्यात आल्याची माहिती नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) दिली आहे. १८४ विमाने आणि ११ चार्टर विमानांतून मायदेशी परत आणण्यात आले आहे. ही आकडेवारी शुक्रवारपर्यंतची आहे. शनिवारी इराणने पुन्हा दुबई विमानतळाला लक्ष्य केल्यामुळे हे विमानतळ पुढील सूचना मिळेपर्यंत बंद करण्यात आले आहे. त्यामुळे शनिवारी कोणतेही विमान तेथून भारतात आले नाही.

२
सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. ८ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## मेळघाटातील शेवटच्या टोकापर्यंत पोहोचत आहेत शासनाच्या योजना

**धारणी :** मेळघाटातील दुर्गम व आदिवासी बहुल भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट त्यांच्या गावात मिळावा या उद्देशाने ङ्खछत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीरङ्ग अभियान राबविण्यात येत आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली धारणीचे कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रदीप शेवाळे यांच्या नियोजनातून या शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.याच अनुषंगाने शनिवार, ७ मार्च रोजी धारणी तहसील कार्यालयांतर्गत धुळघाट रोड परिसरात महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येत शासनाच्या योजनांचा लाभ घेतला. प्राप्त माहितीनुसार या शिबिरामध्ये महसूल विभाग, पंचायत विभाग, आरोग्य विभाग, कृषी विभाग, पुरवठा विभाग, महिला व बालविकास विभाग, विद्युत वितरण कंपनी तसेच इतर शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेत नागरिकांच्या विविध समस्या ऐकून त्यावर मार्गदर्शन व निराकरण करण्याचा प्रयत्न केला.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रम उत्साहात

### ♦ एमएसआयडीसी–महानगरपालिका करारनामा; कर्तृत्ववान महिलांचा गौरव, बचत गटांच्या स्टॉल्सना उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी ८ मार्च

**अमरावती:** जागतिक महिला दिनानिमित्त अमरावती महानगरपालिकेच्या महिला व बाल विकास विभाग, राष्ट्रीय शहरी आजीविका अभियान (NULM) विभाग तसेच शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला मेळावा, कर्तृत्ववान महिलांचा सत्कार, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शनिवारी (दि. ७ मार्च) संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे झालेल्या या कार्यक्रमाला शहरातील महिला बचत गटांच्या सदस्यांसह महिला अधिकारी-कर्मचारी, शिक्षिका व नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग लाभला.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती



महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, आमदार सौ. सुलभा खोडके, आमदार रवि राणा, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पक्षनेता चेतन गावंडे, गटनेता नाना आमले तसेच नगरसेवक-नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्तावित विविध मोठ्या प्रकल्पाकरीता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (शएध्अ्ण्) चे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. ब्रिजेश दिक्षीत व महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्यात पालकमंत्री मा.ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे व मान्यवरांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आज जगभरात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून विविध स्तरांवर महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे.

अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असून ङ्खस्वच्छ अमरावतीङ्ग ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. महानगरपालिकेतील कायमस्वरूपी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावत दररोज किमान आठ तास काम केल्यास शहर अधिक स्वच्छ व सुंदर होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी नवीन प्रशासकीय इमारतीसाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्यात येईल, तसेच शहरातील झोन कार्यालयांची सुविधा अधिक सक्षम व सुस्थितीत करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. अमरावती शहरातील धार्मिक व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अंबादेवी–एकविरा देवी मंदिर परिसर विकास प्रकल्प त्वरित राबविण्यात येणार असून शहरातील सुरक्षाव्यवस्था मजबूत करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य शासनाच्या 'लखपती दीदी' योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून अमरावतीमध्येही ही योजना यशस्वी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. या अंतर्गत १५०० महिला बचत गटांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येणार असून त्यापैकी सुमारे ५०० बचत गट अमरावती शहरातील असतील, असेही त्यांनी सांगितले. अमरावतीच्या नागरिकांना अपेक्षित असलेला विकास निश्चितपणे साध्य करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत असून शहराच्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षा आणि महिला सक्षमीकरण या सर्व क्षेत्रांत ठोस पावले उचलली जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार सुलभाताई खोडके, आमदार रविभाऊ राणा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी प्रास्ताविकातून महिला सक्षमीकरणासाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत असल्याची माहिती दिली. महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे या उद्देशाने महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

## अमरावतीत खंडेलवाल ज्वेलर्सची भव्य दागिने प्रदर्शनी; ग्राहकांच्या हितासाठी विशेष योजना

प्रतिनिधी ८ मार्च

**अमरावती :** मागील नऊ दशकांपासून आणि सहा पिढ्यांपासून ग्राहकांचा विश्वास जपणाऱ्या खंडेलवाल ज्वेलरी अकोला प्रा. लि. तर्फे अमरावतीतील हॉटेल मेहफील-इन येथे सोने व चांदीच्या दागिन्यांची भव्य प्रदर्शनी सुरू झाली आहे. या प्रदर्शनीचे उद्घाटन मनपा आयुक्त सौम्या शर्मा, भाजपचे नेते किरण पातुरकर, दै. हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अ. मराठे, मंडल चे संपादक तथा स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, स्वीकृत नगरसेवक दिनेश बुब तसेच शहरातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात करण्यात आले.

यावेळी खंडेलवाल ज्वेलरीचे संचालक नितीन खंडेलवाल यांनी माहिती देताना सांगितले की, सध्या सोन्या-चांदीच्या बाजारपेठेत दरातील चढ-उतारामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. ही अडचण लक्षात घेऊन ग्राहकांच्या हितासाठी



खंडेलवाल ज्वेलर्सने विशेष योजना सुरू केली आहे. या योजनेत ग्राहकांना आवडते दागिने आधीच बुक करून दर महिन्याला पैसे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे

### ♦ प्रदर्शनीला ग्राहकांचा उत्कृष्ट प्रतिसाद

भविष्यात सोन्याचे दर वाढले तरी ग्राहकांना बुकिंगच्या वेळेचा दर मिळतो आणि दर कमी झाल्यास कमी किमतीत दागिने खरेदी करण्याचा लाभ मिळतो. पारंपरिक डिझाइनसोबतच आकर्षक व आधुनिक दागिन्यांसाठी खंडेलवाल ज्वेलर्स ओळखले जातात. अकोला, वरूड, वाशिम, बुलढाणा यांसह महाराष्ट्रात त्यांची सात शोरूम कार्यरत आहेत. सदारामजी, भिकमचंदजी, शंकरलालजी, मदनलालजी, नितीन-रवी, हर्षल-प्रतिक आणि सुना शौर्या व रिषीका या सहाव्या पिढीच्या सहभागातून खंडेलवाल ज्वेलर्सने दागिन्यांच्या कस्टमाईज डिझाइनमध्येही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या भव्य प्रदर्शनीला अमरावतीकरांचा मोठा प्रतिसाद मिळत असून नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन संचालक नितीन खंडेलवाल यांनी केले आहे. सदर प्रदर्शनीला ग्राहकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे.

## उन्हाळ्याच्या तोंडावर शहर व ग्रामीण मधील पाणी टंचाई

### ♦ आमदार राणा यांनी मजिप्राच्या अधिकाऱ्यांना व मनपा अधिकाऱ्यांना धरले धारेवर

प्रतिनिधी ८ मार्च

**अमरावती :** आढावा बैठकीमध्ये गावागावात व शहरतील पाण्याची समस्या, पाण्याच्या टाकीचे अर्धवट बांधकाम, पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात जल जीवन मिशनची बंद पडलेली कामे, पाण्याच्या पाईप लाईनची बंद पडलेली कामे, शेततलाव या संदर्भात तालुका अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच यांच्याकडुन आढावा घेवून आ.रवि राणा यांनी माहिती घेतली.

शहर तसेच ग्रामिण भागाला उन्हाळ्याच्या तोंडावर पाणी टंचाई पासुन मुक्त करण्याचा बैठकीमध्ये आ.रवि राणा यांनी उपस्थित मनपाचे उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले तसेच युवा स्वाभिमान पार्टीचे सर्व नगरसेवक व ग्रामिण भागतील सरपंच, उपसरपंच, तालुका अध्यक्ष



यांच्या उपस्थितीत घेतला संकल्प केला.

ज्या ज्या गावामध्ये पाण्याची भीषण समस्या आहे त्या त्या गावाला आ.रवि राणा स्वत: सर्व अधिकाऱ्यांसह भेट देणार व पाण्याच्या समस्येवर तोडगा काढणार तसेच ज्या ज्या ठिकाणी कुठेही नळादृवारे गडुळ पाणी आले तर त्या ठिकाणी बैठकीमध्ये मजिप्राच्या अधिकाऱ्यांना ते गडुळ पाणी पाजणार असा इशाराही त्यांनी दिला. माजी खासदार नवनित राणा यांच्या माध्यमातुन खासदार असतांना आणलेल्या ९९५ कोटी रुपयांची कामे सुरु असल्याचे आ.रवि राणा यांनी सांगुन या कामांकरिता मजिप्राची यंत्रणा व मॅन पावर कमी पडत असल्यामुळे मजिप्रा विभागाची यंत्रणा अमरावती मनपाकडे सोपविण्याची उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले व इतर १७ नगरसेवकांची आ.रवि राणा यांच्याकडे केली मागणी.

## स्वबळावर उभे 'आनंदी झुणका भाकर केंद्र'; निशा चव्हाण यांच्याकडून ९ महिलांना रोजगार

प्रतिनिधी ८ मार्च

**अमरावती :** शहरातील कोर्टा समोर सुरू करण्यात आलेले 'आनंदी झुणका भाकर केंद्र' अनेक महिलांसाठी आधार ठरत आहे. हे केंद्र निशा चव्हाण यांनी स्वतःच्या मेहनतीने उभे केले असून त्यातून त्यांनी नऊ महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.

निशा चव्हाण यांनी स्वबळावर हा उपक्रम सुरू करत महिलांना कामाची संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू असलेल्या महिलांना रोजगार मिळाला असून त्यांना स्वतःच्या पायावर उभे



राहण्याची ताकद मिळत आहे. या केंद्रात काम करणाऱ्या महिलांना नियमित उत्पन्न मिळत असल्याने त्यांच्या कुटुंबांनाही मोठा आधार मिळाला आहे.

'आनंदी झुणका भाकर केंद्र'मध्ये ग्राहकांना घरगुती पद्धतीने बनवलेले झुणका-भाकर व इतर पदार्थ मिळतात. चवदार व परवडणाऱ्या दरात मिळणाऱ्या जेवणामुळे या केंद्राला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

निशा चव्हाण यांनी स्वतःचा व्यवसाय उभा करत इतर महिलांनाही रोजगार दिला असून त्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या या प्रयत्नामुळे महिलांच्या स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे दिसून येत असून प्रत्येक महिलांसाठी हा ऐक चांगला अनुभव आहे.

**महिला दिन विशेष**

## महिलांना रोजगाराच्या संधी देण्याचा किरण वानखडे (काळे) यांचा पुढाकार

प्रतिनिधी ८ मार्च

**अमरावती :** रोजगाराच्या क्षेत्रात महिलांना स्वबळावर उभे राहण्यासाठी मदत करण्याचे महत्वपूर्ण काम किरण वानखेडे / काळे करत आहेत. त्या Aureus hR Solutions LL या कंपनीच्या डायरेक्टर असून गेल्या सहा ते सात वर्षांपासून रोजगाराच्या क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत.

कंपनीच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे. विशेषतः महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आणि



त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणे हे कंपनीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या काळात Aureus hR Solutions LLP मार्फत विविध कंपन्यांमध्ये मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात आले आहे. आतापर्यंत १००० पेक्षा जास्त महिलांना रोजगार मिळवून देण्यात कंपनीला यश आले आहे. त्यामुळे अनेक महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून आले आहेत. किरण वानखेडे / काळे यांच्या मते हे केवळ नोकरीचे काम नसून समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची एक जबाबदारी आहे. एखादी महिला स्वतःच्या कष्टाने कमवू लागली की तिचा आत्मविश्वास वाढतो आणि तिचे कुटुंबही अधिक सक्षम होते.

आगामी काळातही Aureus hR Solutions LLP च्या माध्यमातून अधिकाधिक महिलांना आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

## अपंगत्वावर मात करून शिक्षिका बनलेल्या शुभांगी इंगळे यांची प्रेरणादायी वाटचाल

**अमरावती :** जागतिक महिला दिनानिमित्त अनेक कर्तृत्ववान महिलांचा सन्मान केला जात असताना गाडगेनगर येथील शुभांगी इंगळे यांची जिद्द आणि संघर्ष प्रेरणादायी ठरतो. दोन्ही हातांनी आणि पायांनी अपंग असतानाही त्यांनी शिक्षण पूर्ण करून आज समाजासमोर एक आदर्श उभा केला आहे.

शुभांगी इंगळे या सध्या नूतन कन्या शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शारीरिक अडचणी असूनही त्यांनी कधीही हार मानली नाही. आपल्या मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि शिक्षक म्हणून उभ्या राहिल्या. फक्त



शाळेतच नव्हे तर घरीही त्या मुलांना शिकवणी देतात. अपंगत्व असूनही त्यांनी कधी त्याचे दुःख मनात ठेवले नाही. उलट स्वतःच्या कष्टावर उभे राहून त्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त शुभांगी इंगळे यांची ही संघर्षमय आणि प्रेरणादायी वाटचाल समाजातील महिलांना नव्या उमेदीने पुढे जाण्याची प्रेरणा देणारी आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

**खामगाव**

## युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

### ♦ सक्षम भारतासाठी महिला सक्षतीकरण अत्यावश्यक - गोपाल अग्रवाल

प्रतिनिधी ८ मार्च

**खामगाव:** खामगाव येथील युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल सर तर मार्गदर्शनासाठी प्राचार्य अनिरुद्ध सर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रुती लड्ढा, सौ. निर्मला जाधव मॅडम (शिक्षण विस्तार अधिकारी) आणि सौ. सुनिता गवई मॅडम (विषय तज्ञ, पंचायत समिती खामगाव) यांची



विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राची पवार व स्वरा पवार यांनी आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने केले,

स्वागत गीत सोनाली नगरी मॅडम यांनी गायीले तर आभार प्रदर्शन ईश्वरी बोदडे यांनी केले.

यावेळी प्राचार्य अनिरुद्ध सर आणि अध्यक्ष गोपाल अग्रवाल सर यांनी आपले विचार व्यक्त करताना महिला सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले. महिला दिन केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता महिलांचा सन्मान व आदर दररोज केला पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वंशिका गवई, नूतन मोरखडे, स्वरा वाकोडे तसेच इयत्ता पहिलीतील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि इयत्ता पाचवीतील सर्व मुलींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व महिला शिक्षकांचा पुष्पगुच्छ, भेटवस्तू देऊन व पेढे भरवून सन्मान केला आणि महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या शिक्षकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## कर न भरल्यास मालमत्ता जप्त करण्याचा इशारा

प्रतिनिधी ८ मार्च

**खामगाव :** शहरातील मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांवर आता नगर परिषद प्रशासनाने कडक भूमिका घेतली असून, मुदतीत कराचा भरणा न केल्यास संबंधितांची मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे थकबाकीदार नागरिकांनी तातडीने थकीत कर भरून कारवाई टाळावी, असे आवाहन नगर परिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

खामगाव नगर परिषद हद्दीतील अनेक नागरिकांकडे मालमत्ता कर व पाणीपट्टीची मोठ्या प्रमाणात थकबाकी असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषदेकडून थकबाकीदारांना अंतिम सूचना देण्यात आली आहे. नागरिकांनी आपल्या मालमत्तेवरील थकीत कराची रक्कम १५ मार्च २०२६ पूर्वी नगर परिषद कार्यालयात किंवा संबंधित वसुली लिपिकाकडे भरावी, असे आवाहन मुख्याधिकाऱ्यांनी केले आहे. प्रशासनाने दिलेल्या मुदतीपर्यंत कराचा भरणा न केल्यास १६ मार्च २०२६ नंतर थकबाकीदारांची यादी जाहीरपणे तसेच विविध वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधित मालमत्तांवर वारंट काढून जप्तीची कारवाई करण्यात येईल. पुढील टप्प्यात अशा मालमत्ता नगर परिषद खामगावच्या नावे करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार असल्याची माहितीही प्रशासनाने दिली आहे. यासोबतच पाणीपट्टी थकबाकीदार नागरिकांच्या घरांतील नळजोडण्या खंडित करण्याची कारवाईही केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी होणारी गैरसोय व मानहानी टाळण्यासाठी तातडीने थकीत कराचा भरणा करून नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन नगर परिषद खामगावचे मुख्याधिकारी यांनी केले आहे.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. ८ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## 'प्रभात'च्या अर्णव ने दुचाकीसाठी विकसित केले पर्यावरण संवर्धनाचे वैशिष्ट्यपूर्ण उपकरण

**अकोला :** डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेअंतर्गत अंतिम फेरीत निवड झालेल्या प्रभात किड्स स्कूलमधील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्णव गोलोकार याने दुचाकी वाहनांमधून होणारे वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक अभिनव ई.जी.आर.( निष्कासित वायू पुनर्चक्रण प्रणाली ) उपकरण विकसित केले आहे. वाहने सिग्नलवर थांबलेली असताना किंवा आयडल मोडमध्ये असताना मोठ्या प्रमाणावर नायट्रोजन ऑक्साइडसारखे हानिकारक वायू वातावरणात सोडले जातात. या समस्येचा अभ्यास करून अर्णवने हे वैशिष्ट्यपूर्ण उपकरण तयार केले आहे. अर्णवने विकसित केलेले हे उपकरण दुचाकी वाहनांमधून होणारे नायट्रोजन ऑक्साइडसारखे घातक वायूंचे उत्सर्जन कमी करण्यास मदत करणार आहे. विशेषतः वाहने सिग्नलवर थांबलेली असताना किंवा आयडल स्थितीत असताना निर्माण होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. यामुळे केवळ ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण कमी होणार नाही, तर वाहनांमधून निर्माण होणारी अतिरिक्त उष्णताही कमी होण्यास मदत होणार आहे.

## अभियानाच्या पहिल्या दिवशी चार हजारपेक्षा अधिक दाखल्यांचे वाटप



**अकोला:** जिल्ह्यातील नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा-१' राबविण्यात येत असून, अभियानाच्या पहिल्या दिवशी अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत एकूण ७ महसूली मंडळ मुख्यालयी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले होते . या आवाहनाला अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपस्थिति नोंदवली व अभियानांद्वारे दिलेल्या सेवेचा लाभ घेतला या शिबिरांमध्ये सात-बारा, नमुना-८, नामबदल, महसूल कर, वन-विभागाच्या मान्यता, नाहरकत प्रमाणपत्र, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचा लाभ , संगायो योजना , पुरवठा विभागमार्फत रेशन कार्ड वाटप अशा अनेक महसूल आणि इतर सरकारी सेवांचा लाभ एकाच ठिकाणी प्रदान करण्यात आला.

## 'जय भवानी-जय शिवराय'च्या घोषणांनी कुंभारी दुमदुमले

**अकोला :** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कुंभारी येथे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने छत्रपती श्री शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. 'जय भवानी, जय शिवराय' च्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपतालुकाप्रमुख तथा माजी सरपंच बाळासाहेब अतकरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून करण्यात आली. यावेळी श्रीकृष्ण बिडकर गुरुजी, महादेवराव डांबलकर, ज्ञानदेवराव डांबलकर, रामदासजी बहादुरकर, विठ्ठलराव सोनेकार, विनोद ठोंबरे, दिनेश येवतकार, हरिभाऊ आगळे, निलेश टापरे, शिवशंकर डांबलकर, अमोल सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## नूतन विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

प्रतिनिधी ८ मार्च

**आलेगाव:** येथील नूतन विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड होते. त्यांच्या हातून फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.



शिबिर स्थळी महसूल विभागाचे तसेच कृषी विभाग, भूमी अभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महिला व बालविकास विभाग, महा-ई-सेवा केंद्र, आरोग्य विभाग, स्थानिक बँकांचे प्रतिनिधी, बचत गट इत्यादी विविध स्टॉल एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांनी सर्व स्टॉलला भेटी देऊन त्या तर्फे देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा घेतला.

मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रशासनातर्फे मान्यवर डॉ. राहुल वानखडे, गायकवाड तसेच आलेगांव येथील पदाधिकारी यांचे स्वागत केले. ग्राम पंचायत प्रशासक गोपाल महल्ले, माजी उपसभापती इमरान खान, माजी जिल्हा परिषद सदस्य अर्चना राऊत, सुशीलाबाई कापकर, अनिल जैन, अक्षय जैन, किशोर राऊत निलेश कापकर हजर होते.

डॉ. राहुल वानखडे यांनी प्रास्ताविक केले. कृषी विभागामार्फत लाभार्थींना ट्रॅक्टर व कृषी अवजारे वितरित करण्यात आले. या वेळी कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकार हजर होते.महसूल विभागातर्फे २ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचे वारसांचे खात्यात एक लाख रुपये अनुदान जमा करण्यात आले. तसेच उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, दुय्यम शिधा पत्रिका, पी. एम. किसान योजना, आधार कार्ड अपडेशन, संजय गांधी श्रावणबाळ योजना ई केवायसी डिजिटल सातबारा विविध सेवा पुरविण्यात आल्या.

आरोग्य विभागातर्फे गरोदर माता किटचे वाटप, १५० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रमोद गायकवाड, यांनी आलेगाव मंडळातील ग्रामस्थांशी संवाद साधला.

शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पियुष गंगाखेडकर, मंडळ अधिकारी यांनी आभार मानले. शिबीराचे आयोजनाकरिता, नूतन शाळेचे अक्षय जैन, दिनकर केंद्रे नायब तहसीलदार, नायब तहसीलदार तेलगोटे, उजाडे, सपकाळ, ग्राम महसूल अधिकारी शंकर लोखंडे, अमित सबनीस, आरती भागवत, वैशाली तिडके, धनश्री भगत, विनोद बोचरे, अत्रिनंदन खुळे यांनी परिश्रम घेतले.

## ग्रामीण पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी अर्जुन खिरोडकार



**हिवरखेड:** वारी भैरवगड येथ ग्रामीण पत्रकार संघाची बैठक पार पडली. अर्जुन खिरोडकार यांची तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. पश्चिम विदर्भ अध्यक्ष पुरुषोत्तम इंगोले, महिला आघाडीच्या प्रियंका केदार, जिल्हा उपाध्यक्ष नंदकिशोर नागपुरे, राजपाल दामोदर, अनिल कवळकार, कुलदीप चौरे यांच्या उपस्थितीत पदभार देण्यात आला.

या निसर्म्यस्थळी या बैठकीचे आयोजन पुरुषोत्तम इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. निर्भीड, निःपक्ष, पत्रकारांची या संघटनेत वर्णी लागल्याने सर्वत्र संघटनेचे कौतुक केले जात असून यामध्ये आणखी अनेक पत्रकार मोठे मोठे पदे भूषवतील व पत्रकारांचे हक्काचे, जनतेच्या समस्या मांडण्याचे काम केले जाईल असा विश्वास व्यक्त केला.

## कुणबी समाज महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी ८ मार्च

**तेल्हारा :** शहरात कुणबी समाज महिला मंडळाच्या वतीने जगदगुरु तुकाराम महाराज बिजोत्सव निमित्त दहीगांव येथील वृद्धाश्रमाला भेट देऊन तेथील निराधार महिला व पुरुषांना साळी, चोळी, लुगडे, कपडे, दुपट्टे, टोपीचे तथा आरोग्यासाठी लाभदायक असलेल्या खाऊचे वाटप तथा वृक्षारोपण करण्यात आले.



मंडळाच्या तालुका अध्यक्ष सुमनताई कोठे, शहर अध्यक्ष तथा माजी सभापती आरती गायकवाड, नगरसेविका रुपाली हागे, वनमाला खोटरे, मालुबाई वाकोडे, संगीता कोरडे, स्मिता दबडघाव, वैशाली तिव्हाणे, संगीता महाल्ले, मनीषा दबडघाव, शारदा भोंगळ, सुवर्णा तिव्हाणे, जयश्री घंगाळ यांची उपस्थिती होती. ईश्वर सेवा ही रंजल्या गांल्याची सेवा करण्यातच आहे असे प्रतिपादन संघटनेच्या वतीने करण्यात आले.

## रेणूका केकन हिच्या यशाचा मामा मामींना आनंद

प्रतिनिधी ८ मार्च

**अकोट:** पातूर तालुक्यातील पास्टूल गावची कन्या रेणूका दिनेश केकन हिने यूपीएससी परीक्षेत यश मिळविले. तिच्या यशाचे अकोट शहरात देखील कौतुक करण्यात आले. तिचे मामा अरुण काकड यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करून तिचा आत्मविश्वास वाढवला, असे रेणूकाने सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच योग्य दिशा मिळाली आणि मोठे ध्येय गाठणे शक्य झाले, असेही ती नमूद करते.

### ◆ जिद्द, मेहनत आणि संस्कारांची फलश्रुती



आजच्या काळात अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमातील मोठ्या शाळांमध्ये लाखो रुपये खर्च करतात. मात्र, रेणूकाने मराठी माध्यमातून शिक्षण घेत 'जिद्द आणि मेहनत असेल तर माध्यम महत्त्वाचे नसते' हा संदेश समाजासमोर ठामपणे ठेवला आहे. तिच्या यशामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे.

रेणूकाच्या या यशामुळे तिचे नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पातूर तालुका तसेच अकोला जिल्ह्यात सर्वत्र तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडूनही तिचे अभिनंदन केले जात आहे.मराठी माध्यमातून शिक्षण घेऊन देशातील सर्वोच्च प्रशासकीय सेवेत स्थान मिळवणारी रेणूका या भागातील युवक युवतींसाठी आदर्श ठरली आहे. अरुण काकड यांनी पेढे वाटून भाचीच्या यशाचे कौतुक केले.

## शिवजयंती उत्सव जल्लोषात साजरा

प्रतिनिधी ८ मार्च

**अडगांव बु.:** येथील छत्रपती प्रतिष्ठान च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव तिथीनुसार मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिवजयंती उत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून संपूर्ण गावात शिवमय वातावरण झाले होते.




संध्याकाळी ठाणेदार गजानन राठोड, पोलीस पाटील हितेश हागे, छत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पंकज देशमुख यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीला प्रारंभ झाला मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरून वाजत गाजत जल्लोषात निघाली त्यामध्ये बँन्जो वाद्य पथक व महाकाल वाद्य पथक यांनी रग्गत भरली छत्रपती प्रतिष्ठानच्या शेकडो युवकांच्या सह संपूर्ण गावातील शिवप्रेमी सहभागी झाले होते ठीक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य मुर्तीचे पूजन करण्यात आले मिरवणुक शांततेत पार पाडण्यासाठी अकोट उपविभागीय अधिकारी निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरखेड ठाणेदार गजानन राठोड, अडगांव बु पोलीस चौकी, यांनी चोख बंदोबस्त ठेवला. रक्तदान शिबिरात एकूण ६८ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शिवरायांना अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात जगद्गुरु तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. अकोला येथील ठाकरे ब्लड बँक यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

## बाळापूर शहरात शिवजयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी ८ मार्च

**बाळापूर:** शहरात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पोस्ट ऑफिस समोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

आमदार नितीन बापू देशमुख, तालुका प्रमुख योगेश्वर वानखडे, ज्ञानेश्वर महेशने, अकोला शहरप्रमुख राहुल कराळे, बाळापूर शहर प्रमुख आनंद वनचरे, युवा सेना जिल्हा प्रमुख निक्की गुजराती, नगरपरिषद उपाध्यक्ष सुरेंद्र धोपटे, सुभाष धनोकार, सुरेश शेलार, गजानन महाराज पुरी यांच्यासह अनेकांनी छत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन केले.



संध्याकाळी पोस्ट ऑफिस समोरून मुख्य बाजारपेठेतून मिरवणूक काढली. डीजे, ढोल ताशा व बॅन्जोच्या गजरात साई मशीद मार्गे जुनी चवळी, जैन मंदिर गुजरातीपुरा मार्गाने पोस्ट ऑफिस समोर मिरवणुकीची सांगता झाली. शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी होते. संपूर्ण परिसर जय भवानी जय शिवाजीच्या घोषणांनी दुमदुमून गेला. फटाक्यांची आतिषबाजी व वाद्यांमुळे मिरवणुकीत उत्साहाचे वातावरण होते. ठिकठिकाणी नागरिकांनी शिवप्रतिमेचे पूजन केले. पोलिस बंदोबस्तात मिरवणूक शांततेने पार पडली.

## आलेगावच्या 'प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट' मधील ११० विद्यार्थ्यांचा आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत सहभाग

प्रतिनिधी ८ मार्च

**आलेगाव:** येथील जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट मध्ये 'युनिव्हर्सल पोस्टल युनियन - २०२६' अंतर्गत आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेचे दिमाखात आयोजन करण्यात आले. 'डिजिटल युगात मानवी संबंधांचे महत्त्व' या विषयावर आधारित या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.



जिल्ह्यात शाळेचा दबदबा

संपूर्ण अकोला जिल्ह्यातून या स्पर्धेसाठी एकूण १८७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विशेष म्हणजे, आलेगाव सारख्या अतिदुर्गम व ग्रामीण भागात असूनही, केवळ प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या तब्बल ११० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे कौशल्य सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही शाळा नेहमीच तत्पर असल्याचे यातून पुन्हा एकदा दिसून आले.

मार्गदर्शन व नियोजन

सदर स्पर्धेचे आयोजन गटशिक्षणाधिकारी श्री. प्रवीण डाबेराव, आलेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. निवास चव्हाण, विशेष साधनव्यक्ती श्री. राजेंद्रजी कटरे आणि शाळेचे अध्यक्ष श्री. अक्षय जैन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. महावीर जैन यांच्या मार्गदर्शनात शाळेचे शिक्षक श्री. विनोद नप्ते यांनी या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेऊन नियोजन केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

परीक्षण व उपस्थिती

या स्पर्धेचे परीक्षण अकोला हेड पोस्ट ऑफिसचे श्री. आदित्य भालतिलक सर यांनी केले. सकाळी १०:०० ते १०:३० या वेळेत पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी डिजिटल युगात हरवत चाललेल्या मानवी संवादावर पत्राच्या माध्यमातून प्रभावीपणे प्रकाश टाकला.

आजच्या काळात पत्रलेखनाची कला जिवंत ठेवण्याच्या या प्रयत्नाचे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादाचे शिक्षण विभागात कौतुक होत आहे.

## गायत्री नगरच्या कीर्तन महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी ८ मार्च

**अकोला:** श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर कौलखेड च्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या किर्तन महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शनिवार कीर्तन उत्सवात पारनेर येथील कीर्तनकार हभप एकनाथ महाराज चतर यांनी कीर्तनाचे तृतीय पुष्प सादर केले. यात त्यांनी गाथेची महिमा प्रतिपादित करीत सत्संगाची कास धरण्याचे आवाहन केले.कीर्तन उत्सवात विठोबा व संत गजानन महाराज यांची भव्य प्रतिमा लावण्यात आली असून सर्वत्र भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.कीर्तन उत्सव परिसरातील गायत्री मंदिर परिसरात शोभाताई पवार यांचे नित्य सकाळी गाथा पारायण होत असून यात ही भक्तांची उपस्थिती होत आहे.नित्य रात्री ८ ते रात्री १० वाजेपर्यंत चालणाऱ्या या कीर्तन महोत्सवाचे समापन दि १३ मार्च रोजी होत असून आज रविवार दि ८ मार्च रोजी देहू येथील हभप वैभव महाराज राक्षे, यांच्या काल्याच्या कीर्तनाने या कीर्तन महोत्सवाचे समापन होणार आहे.

या कीर्तन महोत्सवाचा समस्त महिला पुरूषांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बीजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर कौलखेडच्या समस्त पदाधिकारी व सेवाधाऱ्यानी केले.

## अकोल्यात काही भागात गढूळ पाण्याचा पुरवठा

### ◆ पाण्याच्या टाक्यांची अनेक वर्षे साफसफाई नसल्याचा आरोप

प्रतिनिधी ८ मार्च

**अकोला :** महानगरपालिकेकडून शहरातील पाण्याच्या टाक्यांची दरवर्षी साफसफाई केली जाते, असा दावा केला जातो. मात्र शहरातील काही भागात अनेक वर्षांपासून टाक्यांची योग्य साफसफाई न झाल्यामुळे नागरिकांना गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याची तक्रार समोर येत आहे.



महानगरपालिकेकडून वर्षातून एकदा पाण्याच्या टाक्यांची साफसफाई केली गेल्यास पाण्यातील गाळ व घाण दूर होते आणि नागरिकांना स्वच्छ पाणी मिळते. मात्र काही भागात ही साफसफाई अनेक वर्षांपासून झालेली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे त्या भागातील घरांमध्ये गढूळ व अस्वच्छ पाणी येत असल्याची समस्या निर्माण झाली आहे.गढूळ पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अकोला महानगरपालिकेने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करावी आणि नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## तार फाईल परिसरातील तणाव प्रकरणी दोन आरोपी अटकेत

प्रतिनिधी ८ मार्च

**अकोला :** शहरातील तार फाईल परिसरात काही दिवसांपूर्वी दोन गटांमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या प्रकरणात रामदास पेठ पोलिसांनी कारवाई करत आठ आरोपींपैकी दोन आरोपींना अटक केली आहे. परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या या आरोपींची पोलिसांनी परेड काढत नागरिकांमधील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला.

मिळालेल्या माहितीनुसार, तार फाईल परिसरात जुन्या वादातून दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या वेळी काही जणांनी हातात लोखंडी पाईप आणि तलवारी घेऊन परिसरात फिरत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.दरम्यान, ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. त्यानंतर रामदास पेठ पोलिसांनी तपास सुरू करत या प्रकरणातील आठ आरोपींपैकी दोन आरोपींना अटक केली आहे.आरोपींमुळे परिसरात निर्माण झालेली दहशत दूर करण्यासाठी पोलिसांनी या आरोपींची तार फाईल परिसरात परेड काढली. या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून उर्वरित आरोपींनाही लवकर अटक करण्याची मागणी करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ८ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पुसद मतदारसंघातील रस्ते-पुलांसाठी ४२ कोटींची तरतूद

## राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याला यश; राज्याच्या २०२६-२७ अर्थसंकल्पात मंजुरी

प्रतिनिधी ८ मार्च

**पुसद :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत सादर केलेल्या महाराष्ट्र राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्पात पुसद मतदारसंघातील रस्ते व पुलांच्या बांधकामासाठी ४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाल्याचे सांगण्यात येत आहे.

या निधीतून पुसद तालुक्यातील राज्य मार्ग, जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग तसेच संबंधित पुलांच्या बांधकाम व दुरुस्तीसाठी कामे हाती घेण्यात




येणार आहेत. त्यामुळे मतदारसंघातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी अलीकडेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) अंतर्गत पुसद येथील पायाभूत सुविधांसाठी ७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून औद्योगिक परिसरातील सुविधा वाढवून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे

> “पुसद मतदारसंघातील उद्योग, रोजगार व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी नाईक परिवार सातत्याने प्रयत्नशील राहील.”
> - राज्यमंत्री इंद्रनील नाईक

सांगण्यात येते.


रस्ते विकासासाठी ४२ कोटी रुपयांची तरतूद झाल्याने पुसद मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळणार असल्याचे स्थानिक पातळीवर सांगितले जात आहे. यामुळे उद्योग, व्यापार आणि दळणवळण व्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान लोकाभिमुख

प्रतिनिधी ८ मार्च

**यवतमाळ :** जिल्ह्यातील शेतकरी, महिला, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना महसूल सेवांचा लाभ गावपातळीवर मिळावा या उद्देशाने राज्य शासनाने ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ अभियान हा लोकाभिमुख प्रशासनाची संकल्पना प्रत्यक्षात उतरविणारा अत्यंत उपयुक्त आणि जनहिताचा उपक्रम आहे. जिल्ह्यातील शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी केले आहे.

आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी शासन-प्रशासन हे जनतेच्या हितासाठी असले पाहिजे, हा आदर्श घालून दिला. न्याय, पारदर्शकता आणि लोककल्याण ही त्यांच्या प्रशासनाची वैशिष्ट्ये होती. त्याच विचारातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली



आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात आज ‘प्रशासन आपल्या दारी’ ही संकल्पना पुढे नेण्याचे काम शासन आणि जिल्हा प्रशासन करत आहे. आजही ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी वारंवार कार्यालयात जावे लागते. अनेकदा माहितीअभावी किंवा प्रक्रियेच्या गुंतागुंतीमुळे त्यांची कामे प्रलंबित राहतात. अशा परिस्थितीत प्रशासनाने स्वतः नागरिकांच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या सोडवणे, ही लोकाभिमुख शासन व्यवस्थेची खरी ओळख आहे. या पार्श्वभूमीवर आजपासून गावपातळीवर २२ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये आणि प्रत्येक महसूल मंडळ तसेच नगरपरिषद स्तरावर हे विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत.

या शिबिरांमध्ये नागरिकांना १५ पेक्षा अधिक महसुली सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या शिबिरांमध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा उताऱ्यातील चुकांची दुरुस्ती करणे, डिजिटल स्वाक्षरी असलेले सातबारा आणि ८-अ उतारे देणे यासारख्या महत्त्वाच्या सेवा दिल्या जाणार आहेत.

तसेच उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रे मिळविण्याची सुविधाही नागरिकांना उपलब्ध होणार आहे. यासोबतच अकृषक (एनए) परवानगी संदर्भातील मार्गदर्शन, सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ, विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनासंबंधी प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप आणि ई-मोजणी अर्ज स्वीकारणे यासारखी अनेक कामे या शिबिरांमधून केली जाणार आहेत. तसेच ॲग्रीस्टॅक आणि पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषक परवानगी संदर्भातील प्रकरणे, गाव दप्तर अद्यावत करण्याची कामेही या शिबिरांमध्ये करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी अनेक सुविधा मिळणार असून त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात वाचणार आहे.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले आहे. या अभियानाच्या यशासाठी प्रशासनाने लोकाभिमुख दृष्टीकोनातून काम करावे. नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने ऐकून त्यांचे त्वरित निराकरण करावे. तसेच हे अभियान अधिक प्रभावीपणे राबवून शासनाच्या विविध योजना आणि सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन देखील पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी केले आहे.

# घरकुल धारकांच्या हप्त्यांचा मुद्दा त्वरित मार्गी लावावा

प्रतिनिधी ८ मार्च

## बहुजन मुक्ती पार्टीची मागणी

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील घरकुल धारकांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या हप्त्यांचा प्रश्न त्वरित मार्गी लावावा, अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीने मुख्यकार्यकारी अधिकारी (CEO), जिल्हा परिषद यवतमाळ यांच्याकडे केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील विविध योजनांमध्ये लाभार्थ्यांना घरकुल योजनेंतर्गत हप्ते देण्यात आले आहेत. तथापि, शासन स्तरावर तांत्रिक अडचणीमुळे अनेक लाभार्थ्यांचे हप्ते थांबले आहेत, ज्यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाला आहे.

मुख्यतः, प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल, शबरी घरकुल, रमाई घरकुल या योजनांच्या लाभार्थ्यांना दुसरा आणि तिसरा हप्ता साठी लागू असलेल्या अडचणींबाबत बिमोद मुधाने, बहुजन मुक्ती पार्टीचे लोकसभा अध्यक्ष यवतमाळ/वाशिम यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, काही लाभार्थ्यांच्या हप्ते जमा झाले आहेत, तर अनेकांची प्रक्रिया थांबलेली आहे. काही लाभार्थ्यांचे पहिले हप्ते देखील जमा झालेले नाही, तर नंतर सोडलेल्या लाभार्थ्यांचे हप्ते मात्र जमा झाले आहेत. यामुळे लाभार्थ्यांना काय करावे, हे समजत नाही आणि त्यामुळं गोंधळ निर्माण झाला आहे. मस्के साहेब (डी.आर.डी.ए) यांच्या मार्फत मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना निवेदन सादर केले असून, दारव्हा तालुक्यातील आणि यवतमाळ जिल्ह्यातील सर्व घरकुल धारकांच्या हप्त्यांचा प्रश्न त्वरित मार्गी लावण्याची मागणी केली आहे. यावेळी शामराव माळवे, विजय महिंद्रे, मनोज तुनगर, रमेश तायडे,



सदानंद खिल्लारे, अमोल सिरसाट, दशरथ शेंदूरकर, श्रीराम पखमोडे, वामन जाधव, संतोष इंगोले, बद्रीनाथ राठोड, अशोक मुजमुले, रामेश्वर राठोड, ओंकार मनवर, रमेश ढगे, अतुल चव्हाण, ज्ञानेश्वर मेश्राम, चंद्रशेखर पाढेन, भुवन मुनेश्वर, राजीव डफाडे, आर. व्ही. देठे, उत्तम बनसोड, देवराव साठे, अरुण गोसाई, रोषणा आडे, युवराज आडे, विलास भोयर, मिलिंद बडशे, संतोष भगत, मधुकर हटकरे आणि इतर अनेक व्यक्तींच्या सह्यांसह निवेदन देण्यात आले आहे.

# महागावात महिलांचा दारूविरोधी लढा; स्वाक्षरी पडताळणीला प्रतिसाद

प्रतिनिधी ८ मार्च

**महागाव :** महागाव प्रभाग क्रमांक १ मधील वादग्रस्त देशी दारू दुकान कायमस्वरूपी बंद करण्यासाठी महिलांनी घेतलेला लढा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक शनिवारी महागाव येथे दाखल झाले आणि निवेदनावरील स्वाक्षऱ्यांची पडताळणी केली.



नगरसेविका जयश्री नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी संबंधित दुकान बंदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन सादर केले होते. या निवेदनावरील सह्या खऱ्या असल्याची खात्री करण्यासाठी महिलांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. सकाळी अकरा वाजल्यापासून महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुन्हा स्वाक्षरी करून आपली भूमिका स्पष्ट केली.

या वेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक डी. एस. वाघ, उपनिरीक्षक अनिल पिकले, सुकेशनी शिंदे, जमादार वाघजी बोंबले, पंजाब राठोड, कॉन्स्टेबल प्रतीक्षा उके आणि पूनम गटलेवार उपस्थित होते.

> **नगरसेवकांची अनुपस्थिती चर्चेत**
> स्वाक्षरी पडताळणी दरम्यान सत्ताधारी व विरोधी पक्षातील काही नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने शहरात राजकीय चर्चा रंगली. स्थानिक राजकीय वर्तुळात या बाबतीत टीकाटिप्पणी सुरू झाली असून, नागरिकांनी या लढ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची दखल घेतली जात आहे.

निवेदनातील ५१ महिलांपैकी ४७ महिलांच्या सह्यांची पडताळणी पूर्ण झाली, तर चार महिला काही कारणास्तव अनुपस्थित राहिल्या. या प्रक्रियेनंतर पुढील टप्प्यात मतदान होणार असून तारीख लवकरच जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महिलांनी घेतलेला पुढाकार शहरभर चर्चेचा विषय ठरला आहे. या मोहिमेत संभाजीदादा नरवाडे, नगरसेवक सुरेश पाटील नरवाडे, शैलेश कोपरकर, शहराध्यक्ष नीलेश नरवाडे, संजय नरवाडे, उदय नरवाडे, रफिक सुरैया, डॉ. पंजाब राठोड, रियाज पारेख, बळीराम राठोड आणि संजय अमिलकंठवार यांनी महत्त्वाचा सहभाग घेतला.

# अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार

प्रतिनिधी ८ मार्च

**कळंब :** येथील राळेगाव मार्गावर आमला गावाजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या बंद ट्रकवर दुचाकी आदळून झालेल्या भीषण अपघातात ५० वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. किसन उर्फ बाळाभाऊ यशवंत कन्नाके (वय ५०, रा. नागठाण गुजरी, ता. राळेगाव) असे मृताचे नाव आहे. ही घटना ६ मार्च रोजी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मृतक किसन कन्नाके हे कळंब येथील इलीयाज खान यांच्याकडे



गेल्या अनेक वर्षांपासून ‘दिवाणजी’ म्हणून कार्यरत होते. सध्या ते राळेगाव रोडवरील चौफुली येथे सुरू असलेल्या एका व्यावसायिक संकुलाच्या (कॉम्प्लेक्स) बांधकामाची देखभाल करीत होते. ६ मार्च रोजी कुटुंबीयांनी घरी बोलावल्याने ते कामावरून आपल्या दुचाकीने नागठाण गुजरीकडे निघाले. दरम्यान, आमला गावाजवळ गेल्या दोन दिवसांपासून एक ट्रक नादुरुस्त अवस्थेत उभा होता. हा ट्रक रस्त्याच्या कडेला नसून मुख्य मार्गावरच उभा होता. रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांचा प्रखर प्रकाश डोळ्यांवर पडल्याने किसन यांनी दुचाकी बाजूला घेतली; मात्र अंधारात उभा असलेला ट्रक न दिसल्याने त्यांची दुचाकी थेट ट्रकवर आदळली. हा अपघात इतका भीषण होता की किसन कन्नाके यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच कळंब पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला असून, दिलेल्या तक्रारीवरून ट्रक मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार कडुकर करीत आहेत.

# अमेरिकेतील प्रख्यात सर्जन व लेखक डॉ. अतुल गावंडे उमरखेडला येणार

प्रतिनिधी ८ मार्च

**उमरखेड :** येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाचे संजीवक, मूळ भारतीय वंशाच्या रोटेरियन कै. डॉ. सुशीलाताई आत्मारामजी गावंडे यांचा अस्थिकलश घेऊन अमेरिका निवासी, प्रख्यात सर्जन व लेखक डॉ. अतुल गावंडे तसेच सुकन्या प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. सुमिता गावंडे हे १० मार्च रोजी भारतात येणार आहेत. त्यांच्या हस्ते गावंडे महाविद्यालयात कै. डॉ. सुशीलाताई गावंडे यांच्या अस्थिकलशाचे दर्शन, पूजन व श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाचे संजीवक कै. डॉ. आत्मारामजी गावंडे व कै. डॉ. सुशीलाताई गावंडे यांनी या महाविद्यालयाला आपले तिसरे अपत्य मानले होते. त्यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी भरघोस आर्थिक मदत करून शैक्षणिक उभारणीत मोलाचे योगदान दिले होते. दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी अमेरिकेत वास्तव्यास असताना डॉ. सुशीलाताई गावंडे यांचे दुःखद निधन झाले होते. आता त्यांचे सुपुत्र डॉ. अतुल



गावंडे व सुकन्या ॲड. सुमिता गावंडे हे त्यांचा अस्थिकलश घेऊन गावंडे महाविद्यालयात येणार आहेत. १० मार्च रोजी महाविद्यालयात त्यांच्या अस्थिकलशाचे दर्शन, पूजन व श्रद्धांजली अर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास गावंडे परिवारावर प्रेम करणाऱ्या सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, सचिव डॉ. यादवराव राऊत व प्राचार्य डॉ. माधव कदम यांनी केले आहे.

# अर्जुना येथील शिबिरात २,०८६ लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ

प्रतिनिधी ८ मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ तालुक्यातील अर्जुना येथील जिल्हा परिषद शाळेत शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण २,०८६ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवून दिला.

शिबिराची सुरुवात सकाळी ९ वाजता विद्यार्थ्यांसोबत अभियानाची प्रभात फेरी काढून करण्यात आली. यावेळी अर्जुना ग्रामपंचायतीचे सरपंच, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, विधी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ.






सुप्रभा यादगिरवार, ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद यादगिरवार व तालुका कृषी अधिकारी पूजा गवई उपस्थित होत्या.

डॉ. प्रमोद यादगिरवार यांनी शेतकऱ्यांना हंगामपूर्व शेती मशागती, आधुनिक शेती पद्धती व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर डॉ. सुप्रभा यादगिरवार यांनी महिलांशी संवाद साधत आर्थिक सक्षमता, महिला अधिकार आणि कायद्याबाबत माहिती दिली. कृषी विभागाने महाविस्तार ॲप बाबत मार्गदर्शन केले, महसूल विभागाने नवीन शासन निर्णय व धोरणांची माहिती दिली, तर डाक विभागाने विविध योजनांची माहिती नागरिकांना पुरवली. शिबिरात नायब तहसीलदार रुपाली बेहरे यांनी विद्यार्थ्यांसाठी “प्रशासनाची तोंडओळख” हा उपक्रम राबविला, प्रश्नमंजुषा स्पर्धेत विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. शिबिरात पंचक्रोशीतील गावांचे सरपंच सहभागी झाले व नागरिकांना लाभांविषयी माहिती दिली. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढवले आणि यशस्वी अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त केले. अर्जुना मंडळाचे अधिकारी नितीन खरोडे, ग्राम महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

नागरिकांना विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने मोठा फायदा झाला.

# ब्राह्मणगावात दीड लाखांची दारू जप्त

प्रतिनिधी ८ मार्च

## एलसीबीची धडक कारवाई; दोघांना अटक

**उमरखेड :** तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून अवैध दारू विक्रीप्रकरणी दोघांना अटक केली. या कारवाईत सुमारे १ लाख ४६ हजार १७० रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली.

यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पथक उमरखेड उपविभागात गस्त घालत असताना ब्राह्मणगाव येथे मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

त्यानुसार शनिवारी सकाळी सुमारे आठच्या सुमारास पथकाने गावात छापा टाकत पंचांसमक्ष कारवाई केली.

या कारवाईत विजय ऊर्फ पप्पू मारोती कर्नेवाड (३३) व नितीन प्रकाश पलंचेवार (५०), दोघेही



रा. ब्राह्मणगाव, यांना ताब्यात घेण्यात आले. विजय कर्नेवाड यांच्या घरातून देशी दारू ‘भिंगरी’ १८० एमएलच्या ३२ पेट्या (प्रत्येकी ४८ नग) तसेच ९० एमएलच्या ५ पेट्या (प्रत्येकी १०० नग) असा साठा आढळून आला. तर नितीन पलंचेवार यांच्या ताब्यातून देशी दारूच्या २० शिश्या आणि विदेशी दारूच्या ७ शिश्या जप्त करण्यात आल्या.

या कारवाईत एकूण २०५६ देशी व ७ विदेशी दारूच्या शिश्या असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याची किंमत १ लाख ४६ हजार १७० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये उमरखेड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक

> **अवैध दारू विक्रीवर नागरिकांची नाराजी**
> उमरखेड पोलीस ठाणे हद्दीतील ब्राह्मणगाव व चातारी परिसरात अवैध दारू विक्री वाढल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे. काही ठिकाणी पोषक राजकीय वातावरणाचा फायदा घेत अवैध विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड तसेच एलसीबीचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय धिरज बांडे, पीएसआय शरद लोहकरे आणि त्यांच्या पथकाने पार पाडली.

# ‘व्हिजन महाराष्ट्र’ला चालना देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प : आ.किसनराव वानखेडे

प्रतिनिधी ८ मार्च

**उमरखेड :** राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प प्रगतीशील, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाचा स्पष्ट आराखडा मांडणारा असून ‘व्हिजन महाराष्ट्र’च्या माध्यमातून राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणारा ठरेल, असा विश्वास उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांनी व्यक्त केला आहे.

आज सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा दस्तऐवज नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी दूरदृष्टी, ठोस दिशा आणि सर्वसमावेशक विकासाची भूमिका स्पष्ट करणारा आहे. सुशासन आणि



गतिमानतेच्या चार भक्कम स्तंभांवर उभ्या असलेल्या या अर्थसंकल्पातून राज्याच्या शाश्वत आणि सर्वांगीण विकासाचा स्पष्ट आराखडा समोर येतो, असे वानखेडे यांनी नमूद केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या या दूरदर्शी अर्थसंकल्पाबद्दल त्यांनी अभिनंदनही व्यक्त केले. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, ग्रामीण आणि नागरी समाजघटकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या आहेत. विशेषतः शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजना’ आणि ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’ योजना कायम ठेवण्याचा निर्णय राज्यातील कोट्यवधी शेतकरी आणि महिलांसाठी दिलासादायक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. या निर्णयांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळेल आणि शेती क्षेत्राला नवी उभारी मिळेल, असे वानखेडे यांनी म्हटले.

याशिवाय, समाजात माणुसकीचे संस्कार रुजविणाऱ्या थोर समाजसुधारकांच्या स्मरणार्थ येणारे वर्ष ‘सामाजिक समता व समरसता वर्ष’ म्हणून साजरे करण्याची घोषणा ही सामाजिक जाणीव अधोरेखित करणारी बाब असल्याचे त्यांनी सांगितले. एकूणच, राज्याच्या विकासाला नवी गती देणारा, सर्व घटकांना बळ देणारा आणि सामाजिक समतेचा विचार अधोरेखित करणारा हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेणारा ठरेल, असा विश्वास आमदार वानखेडे यांनी व्यक्त केला.

५
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. ८ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

नेत्यांचे मागणी पत्र,
अन् श्रेयवादाचे सत्र,
आश्वासनच मात्र...

प्रकल्प नाही आले
विकासाचे झाले येले
पाटबंधारे मंडळ गेले

# जिल्हा उपेक्षित, अधिवेशनात दुर्लक्षित कायम आकांक्षित !

## *रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी *जिल्हा नदी जोड मधून वगळला...





● अतिष देशमुख @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्याची आकांक्षीत जिल्हा म्हणून नोंद आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी वेगळा निधी येणे तर सोडा पाठबंधारे मंडळही गेले. कोणतेच मोठे प्रकल्प नाही आले. जिल्ह्याचा नदीजोडमध्ये अद्यापही समावेश झाला नाही. तर वाशीम शहरातून जाणारा रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरी होत आहे. सिंचनाचा अनुषेश कायम असून कायद्या व नियम वाशीम जिल्ह्यासाठी नसल्याचे दिसून येत आहे. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याकडे दुर्लक्ष झाले असून नेत्यांचे मात्र, कायम मागणी सत्र सुरू आहे. श्रेयवादासाठी मात्र, आश्वासनावर आश्वासन देवून जिल्ह्याला उपेक्षीतच ठेवल्या जात आहे.

आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.


गडकरी साहेब, खरे अन् स्पष्ट बोलतात
लोकप्रतिनिधींना विकासाचे नाही 'भान', नितीन गडकरींनी टोचले 'कान'!
नितीन गडकरी साहेब, जिल्ह्यातील... लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना, नाही शरम, झाले बेशरम! राजकारणी झाले व्यापारी, जनतेला केले भिकारी
अधिकाऱ्यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेने वाशीम जिल्ह्यातील जलसंधारणाची कामे रखडली!
अनेक प्रकल्प रखडले... जिल्ह्याचा विकास खुंटला! श्रेयवादाची लढाई लढा, अन् विकासाचा मार्ग काढा
चौकशीही नाही, अन् कारवाई नाही!
भ्रष्टाचाराने पोखरले, अनेक प्रकल्प रखडले, रस्ते उखडले!

## जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलानंतर !



जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक आहे. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही.यावरून निष्क्रीयता सिध्द होते.

## जिल्ह्याच्या विकासासाठी, सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा

नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळल्याचे वृत्त मालिका सातत्याने सांध्य. दै. सिटी न्युज सुपरफास्ट लावून धरत आहे. तर या सिंचनाचा अनुषेश भरूण काढण्यासाठी व मागासलेले पण दुर करण्यासाठी ,विकासाचा मार्ग काढण्यासाठी ,रखडलेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी, रस्त्याच्या दुरूस्तीसाठी ,भ्रष्टाचाराच्या विरोधात सिटी न्युज सुपरफास्ट सातत्याने पाठपुरावा करून प्रत्येक भ्रष्टाचाराच्या व न्यायाच्या शेकडो वृत्त मालिका लावून लक्ष वेधत असते तरी सुध्दा मात्र आकांक्षीत जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून कलंक पुसण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही फक्त निवेदनाचे पत्र देवून श्रेयवादाचे सत्र सुरू आहे. जिल्हा वासीयांना मात्र आश्वासनच मिळत आहे.

### अकोला

वाशीम जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या लक्ष्मीदर्शनाच्या लालसेमुळे अनेक प्रकल्प रखडले असल्याचे जाहीर वक्तव्य चार वर्षापूर्वी अकोला येथील कार्यक्रमात केले. या संदर्भात आपण वाशीम जिल्हा अधिकाऱ्यांसोबत फोनवर बोलून संबंधित अधिकाऱ्यांबद्दल नाराजी व्यक्त केली होती. असे ना.नितीन गडकरी म्हणाले होते.

### हिंगोली

अकोला -नांदेड महामार्गातील वाशीम शहरातून जाणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी ६ वर्षापूर्वीच पाटणी कॉम्प्लेक्सच्या कार्यक्रमात मंजुरी दिली. मात्र लोकप्रतिनिधी या कामासाठी पाठपुरावा न केल्यामुळे हे काम अपूर्ण राहीले. आणि आपणही विसरून गेल्याचे ना. गडकरी यांनी हिंगोली येथील कार्यक्रमात सांगितले. यावरून वाशीमचे लोकप्रतिनिधी किती कर्तव्यदक्ष आहे हे सिध्द होते.

### नितीन गडकरींनी आतापर्यंत ३ वेळा टोचले कान, विकासाचे नाही भान ...

केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी वाशीम जिल्ह्यातील अधिकाऱ्यांबद्दल अकोला येथील कार्यक्रमात २ वर्षापूर्वी अधिकाऱ्यांच्या लक्ष्मी दर्शनामुळे जिल्ह्यातील प्रकल्प रखडले असल्याचे सांगितले तर ६ महिन्यापूर्वी हिंगोली येथील कार्यक्रमात वाशीमच्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे आणि मी विसरल्यामुळे ६ वर्षापूर्वी एका कार्यक्रमात मुंजर केलेला रस्त्याच्या कामाचा पाठपुरावा न केल्याने हे रस्त्याचे काम अपूर्ण राहील्याचे जाहीरपणे सांगितले होते. वाशीम येथील कार्यक्रमातही लोकप्रतिनिधींना विकासाचे नाही 'भान', गडकरींनी पुन्हा टोचले 'कान' यावरून अधिकाऱ्यांच्या लक्ष्मीदर्शनामुळे प्रकल्प रखडले आहेत. तर लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळेच जिल्ह्याचा विकास खुंटल्याचे जाहीर झाले आहे. मात्र तीन वेळा नितीन गडकरींनी अधिकारी व लोकप्रतिनिधींचे कान टोचूनही त्यांना शरम नाही ते बेशरम झाले आहे. राजकारणी व्यापारी झाल्याने जनता भिकारी होत आहे. श्रीमंत श्रीमंत होत चालला तर गरीब गरीब होत चालला आहे.

### वाशीम

वाशीम येथील कार्यक्रमात नगर पालिकेकडे पैसे नसतील तर विष घ्यायला पैसे आहेत का असा टोला गडकरींनी दिला होता. तर आमदार , खासदारांनी ठेकेदारांना त्रास देवू नये, विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. अशी ग्वाहीही दिली. मात्र श्रेयवादाची लढाई लढा अन् विकासाचा मार्ग काढा असे त्यांनी वाशीम येथील कार्यक्रमात सांगितले.

### अधिवेशन

अर्थसंकल्प अधिवेशनात वाशीम जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. जिल्ह्याच्या विकासासाठीही लोकप्रतिनिधीनी आराखडा तयार करून अर्थ संकल्पात सादर केला नाही. त्यामुळे राज्याच्या अर्थसंकल्पात वाशीम आकांक्षित जिल्हा म्हणून पुन्हा दुर्लक्षीतच झाला आहे.


वाशीम Express
प्रकल्प नाही आले विकासाचे झाले येले पाटबंधारे मंडळ गेले
जिल्हयात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर !
*लोकप्रतिनिधीचे प्रयत्न निष्फळ* अखेर पाटबंधारे मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उदघाटन
नितीन गडकरींनीही व्यक्त केले होती नाराजी
पाटबंधारे विभागाचा भ्रष्टाचार निवळला, जिल्हा नदीजोड प्रकल्पातून वगळला!
*अधिकारी भ्रष्टाचारात सक्रीय* जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी निष्क्रीय
खुद्द मुख्यमंत्र्याकडूनच कळले... नदी जोड प्रकल्पातून जिल्ह्याला नाही वगळले!
*दुसऱ्या टप्प्यात होणार समावेश - मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचे आश्वासन
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम शुक्रवार दि.१२ डिसेंबर २०२५
भ्रष्टाचार जडला, श्रेयवाद नडला... नदीजोडला जिल्हा नाही जोडला!
*अधिवेशनात पुन्हा बैठकीचे सत्र * आकांक्षीत जिल्हा म्हणून कलंकच मात्र

## थोडक्यात

### गोविंद विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीचे दर्शन



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

येथून जवळच असलेल्या श्री गोविंद विद्यालय पार्डी ताड येथे विविध महानायिकांच्या भूमिकेत विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावशाली वेशभूषा साकारली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विद्यालयामध्ये महानायिकांच्या भूमिकेतील अशी स्त्री जिने आपल्या कार्याने, शौर्याने, गुणांनी समाजात एक अफाट आदर्श निर्माण केला अशा महान स्त्रियांच्या वेशभूषेचे आयोजन विद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षक सदानंद ठाकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक शामराव ठाकरे लाभले. यानंतर जगदीश गावंडे, मीना नानुटे, आकाश ठाकरे, महादेव बोरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करून झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश गावंडे, यांनी तर प्रास्ताविक गोपाल गावंडे व आभार प्रदर्शन अनेश मस्के यांनी केले.

## शॉर्ट सर्किटमुळे उभ्या गव्हाच्या पिकाला आग

### सावरगाव जिरे येथे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाशिम तालुक्यातील सावरगाव जिरे येथील शेतशिवारात विद्युत तारांमध्ये झालेल्या घर्षणामुळे पडलेल्या ठिणगीमुळे उभ्या गव्हाच्या पिकाला आग लागून तीन ते चार एकरांतील गहू जळून खाक झाल्याची घटना शनिवारी (दि. ७) दुपारी सुमारे १.१० वाजताच्या सुमारास घडली. या आगीत अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून काढणीला आलेले पीक डोळ्यांसमोर जळून गेल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.प्राप्त माहितीनुसार, सावरगाव जिरे येथील रिठद रस्त्यालगतच्या शेतशिवारातून विद्युत वितरण कंपनीची वीज वाहिनी गेली आहे. या वाहिनीवरील काही तारा लोंमकळलेल्या अवस्थेत असल्याने त्यांच्यात घर्षण होऊन ठिणग्या पडत होत्या. दुपारच्या सुमारास अशाच ठिणगीपैकी एक ठिणगी शेतात पडली. त्या ठिकाणी काढणीसाठी तयार असलेले गव्हाचे पीक असल्यामुळे काही क्षणातच आगीने पेट घेतला आणि आग वेगाने पसरत गेली.आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील शेतकरी तत्काळ धावून आले. त्यांनी पाण्याच्या साहाय्याने व इतर साधनांनी आग विझविण्याचे प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे काही वेळाने आग आटोक्यात आली; मात्र तोपर्यंत सुमारे तीन ते चार एकरांतील गव्हाचे पीक जळून खाक झाले होते. या आगीत सावरगाव जिरे येथील ओंकार वानखेडे यांचा दीड एकरांतील गहू जळून खाक झाला. तसेच दत्ता सोपान वानखेडे व सिताराम सोपान वानखेडे यांच्या प्रत्येकी एक एकरांतील गव्हाचे नुकसान झाले. दामोदर काळे यांच्या शेतातील अर्ध्या एकरांतील गहू आगीत जळून गेला. दरम्यान, इतर शेतकऱ्यांनी तत्परतेने प्रयत्न केल्यामुळे शेजारील काही शेतांतील गहू वाचविण्यात यश आले.याशिवाय श्रीराम सोपान वानखेडे यांच्या शेतातील हळदीच्या पिकासाठी दीड एकर क्षेत्रावर बसविण्यात आलेली ड्रीप सिंचनाची पाईपलाईनही या आगीत पूर्णपणे जळून खाक झाली. त्यामुळे त्यांचेही मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.सध्या परिसरात गव्हाची काढणी सुरू असून शेतकरी पीक कापणीच्या कामात व्यस्त होते. अशातच अचानक लागलेल्या आगीमुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, शेतातून गेलेल्या वीजवाहिन्यांच्या लोंमकळलेल्या तारांमुळेच घर्षण होऊन ठिणगी पडली आणि आग लागल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. संबंधित वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळेच ही घटना घडल्याचे सांगत शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.या घटनेची तात्काळ दखल घेऊन महसूल प्रशासनाने पंचनामा करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे.

## शेलुबाजार परिसरात अवैध प्रवासी वाहतूक !

● सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार ●



शेलुबाजार शहरात वाहतूक पोलिसांच्या समोरच धोकादायक पद्धतीने अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. शहराप्रमाणेच जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही अवैध प्रवासी वाहतुकीने अक्षरशः कहर केला असून, या प्रकाराकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

शहरात काही प्रमाणात अशा वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत असले तरी ग्रामीण भागात वाहतूक पोलिसांचे अस्तित्वच दिसत नसल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी तर नियमबाह्य खासगी प्रवासी वाहतूक करणारे आणि वाहतूक पोलिस यांच्यातील संबंध इतके सैल असल्याची चर्चा आहे की, जणू खासगी वाहतूकदारांना कोणतीही कारवाई होणार नाही, असा विश्वास निर्माण झाला आहे.यामुळे अनेक रिक्षा आणि टॅक्सींमध्ये क्षमतेपेक्षा अनेक पट जास्त प्रवासी कोंबून भरले जातात. काही वेळा तर प्रवासी वाहनाच्या मागे लटकून किंवा टपावर बसून प्रवास करताना दिसतात. अशा प्रकारच्या धोकादायक वाहतुकीमुळे अपघाताचा धोका कायम निर्माण होत असतो. एखादा अपघात घडला की काही दिवस कारवाईचे नाटक केले जाते; मात्र नंतर परिस्थिती पुन्हा 'जैसे थे' होते, अशी तक्रार नागरिकांकडून केली या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागात नियमित तपासणी मोहीम राबवून अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. ८ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यातील 'धुरंधर' महिला !

**अकोला** : प्रेम, वात्सल्य अन् करूणेचे प्रतीक असलेली महिला आता सर्वच क्षेत्रात हिरीरीने भाग घेत पुढे जात आहे. आपल्या कार्यशैलीची छाप ते इतरांवर सोडत असून, योग्य निर्णयक्षमता, काटेकोर नियोजन आणि समन्वय या त्रीसूत्रीच्या जोरावर तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वकर्तृत्वातून ती यशोशिखराकडे वाटचाल करीत असताना आपल्या भगिनींनाही विकासाच्या प्रवाहात सामील करून घेण्यासाठी ती झटत असल्याचे दिसून येते. आजची स्त्री ही 'आयकॉन' ठरत आहे. सामाजिक बांधिलकीने झपाटलेल्या जिल्ह्यातील उच्च पदस्थ महिला अधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्त्या आणि उद्योजक महिला यांनी मोठ्या जिद्द, चिकाटी अन् अपार कष्टातून यश मिळविले आहे.

# प्रशासनाचा 'स्त्री-शक्ती' सुवर्णकाळ

### ♦ अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी मांडला प्रगतीचा हुंकार !



**अकोला:** 'प्रशासकीय खुर्चीवर बसलेली व्यक्ती ही केवळ एक 'अधिकारी' असते, तिथे स्त्री किंवा पुरुष असा भेदाभेद नसतो. जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे हेच आमचे एकमेव ध्येय असते,' अशा स्पष्ट आणि करारी शब्दांत अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी महिला दिनाचे औचित्य साधून आपले परखड विचार मांडले.स्वातंत्र्योत्तर काळात महिलांनी गाठलेले प्रगतीचे शिखर आणि बदलत्या काळातील प्रशासकीय आव्हाने यावर त्यांनी प्रकाश टाकला.महिला दिनानिमित्त आर.आर.सी. ला दिलेल्या या विशेष मुलाखतीत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आधुनिक महिलांच्या कर्तृत्वाला सलाम केला. त्यांच्या या प्रभावी संवादामुळे जिल्हा प्रशासनातील महिला अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला असून, अकोला जिल्ह्याच्या विकासासाठी त्या 'सशक्त' पावले उचलत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून अकोल्याच्या जिल्हाधिकारी पदाची धुरा सांभाळणाऱ्या वर्षा मीना यांनी प्रशासकीय सेवेतील आपल्या अनुभवावर भाष्य करताना सांगितले की, 'स्त्री म्हणून काम करताना मला वेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागले असे कधीच वाटले नाही. जिल्हाधिकारी म्हणून जी कर्तव्ये आहेत, ती पूर्ण निष्ठेने पार पाडणे हीच माझी प्राथमिकता आहे.' त्यांच्या या विधानातून प्रशासनातील स्त्री-शक्तीचा आत्मविश्वास आणि कणखरपणा प्रकर्षाने दिसून आला.

### सोशल मीडिया हा प्रशासनाचा 'तिसरा डोळा'

आजच्या काळातील महिलांच्या स्थितीवर भाष्य करताना त्या म्हणाल्या, '२०२६ मधली महिला आज प्रत्येक क्षेत्रात आपले अस्तित्व सिद्ध करत आहे. घराघरातून महिला नोकरीसाठी बाहेर पडत आहेत, ही देशाच्या प्रगतीची मोठी पाऊलखूण आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय महिलांनी सामाजिक आणि आर्थिक स्तरावर घेतलेली झेप कौतुकास्पद आहे. 'प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर किती महत्त्वाचा आहे, हे सांगताना त्यांनी सोशल मीडियाच्या भूमिकेवर विशेष भर दिला. शहरात किंवा जिल्ह्यात कुठेही एखादी घटना घडली, तर सोशल मीडियामुळे प्रशासनापर्यंत त्याची माहिती क्षणात पोहोचते. प्रशासकीय सेवा देण्यात प्रशासन कुठे कमी पडत आहे, याची जाणीव नागरिकांच्या प्रतिक्रियेतून होते. सोशल मीडियाच्या फीडबॅकमुळे तातडीने निर्णय घेणे आणि कार्यवाही करणे सोपे झाले आहे. प्रशासनाचा आता सोशल मीडियाच्या प्रभावी वापरावर मोठा फोकस आहे,' असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# वैयक्तिक, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा 'बचत गट'

### १३ हजार गटांतून अकोल्यात महिला क्रांती ! जिल्हा परिषद सीईओ अनिता मेश्राम यांचा 'उमेद' हुंकार



**अकोला :** 'ग्रामीण भागातील महिलांमध्ये अफाट क्षमता असून, त्यांना केवळ संधी आणि योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. आज अकोला जिल्ह्यात १३ हजारांहून अधिक महिला बचत गट 'उमेद' अभियानांतर्गत ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देत आहेत,' असे प्रतिपादन अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विशेष संवादात त्या बोलत होत्या. केवळ ग्रामीण अर्थव्यवस्था महिला बळकट करत नसून त्यांनी स्वतःच्या घरातील आर्थिक व्यवहार ताब्यात घेत जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे. महिला स्वयंपुर्ण होत असताना आर्थिक दृष्ट्या इतरांवरचे अवलंबन आता संपल्यात जमा आहे. स्वतःच्या पायावर उभ्या राहणाऱ्या असंख्य महिला आज आमच्या प्रेरणास्थान झाल्या आहेत. असे मत अनिता मेश्राम यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागातील महिलांना केवळ चूल आणि मुलापुरते मर्यादित न ठेवता, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने कंबर कसली असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

### बचत गटांचे जाळे आणि 'सीएलएफ'चे पाठबळ

जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाचा लेखाजोखा मांडताना अनिता मेश्राम म्हणाल्या की, जिल्ह्यात सध्या १३ हजारांहून अधिक बचत गट सक्रिय आहेत. या गटांना तांत्रिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन देण्यासाठी ५२ सीएलएफ कार्यरत आहेत. या फेडरेशनच्या माध्यमातून महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण, बँकिंग व्यवहार आणि उत्पादित मालाच्या मार्केटिंगबाबत सखोल माहिती दिली जाते. यामुळे ग्रामीण महिलांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण होत आहे. महिलांना केवळ कर्ज उपलब्ध करून देणे हा उद्देश नसून, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे हे मुख्य लक्ष्य आहे. यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी आणि सरकारी योजनांची माहिती देण्यासाठी ठिकठिकाणी शिबिरे घेतली जातात. शिवणकला, हस्तकला, कृषी प्रक्रिया उद्योग आणि आधुनिक कौशल्यांचे धडे दिले जात आहेत. महिलांनी संघटित होऊन स्वतःचे हक्क आणि सामाजिक प्रगती कशी साधावी, यासाठी गावपातळीवर उपक्रम राबवले जात आहेत.

### 'स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा'

महिला दिनानिमित्त जिल्ह्यातील भगिनींना संदेश देताना सीईओ अनिता मेश्राम म्हणाल्या, 'आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी आपल्यातील न्यूनगंड काढून टाकून स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा. जेव्हा एक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होते, तेव्हा संपूर्ण कुटुंब आणि पर्यायाने समाज प्रगत होतो. 'जिल्हा परिषदेच्या या विविध उपक्रमांमुळे अकोल्यातील ग्रामीण महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, त्या आता सामाजिक आणि आर्थिक बदलाच्या खऱ्या 'दूत' बनत असल्याचे समाधानही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# रुग्णसेवेचा 'नर्सिंग' वारसा आणि समर्पित सेवा

### जीएमसीच्या ग्रेसी ऑगस्टिन यांचा प्रेरणादायी प्रवास !



**अकोला :** शासकीय रुग्णालय म्हटले की समोर येतात त्या लांबच लांब रांगा आणि कामाचा ताण. मात्र, याच ताणतणावाच्या वातावरणात 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' मानून अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कार्यरत असलेल्या ग्रेसी ऑगस्टिन या रुग्णसेवेचा एक नवा आदर्श निर्माण करत आहेत. आव्हानात्मक परिस्थितीतही रुग्ण आणि कर्मचाऱ्यांमध्ये सुसंवाद राखण्याचे कसब त्यांनी आत्मसात केले आहे.

### मर्यादित मनुष्यबळ, पण अफाट जिद्द

♦ रुग्ण सेवा करताना येणाऱ्या अडचणी आणि इतर बाबींची ग्रेसी ऑगस्टिन यांनी वास्तव परिस्थिती मांडली. त्या म्हणाल्या, 'जीएमसीमध्ये सध्या कर्मचाऱ्यांची काही प्रमाणात कमतरता नक्कीच आहे. मात्र, स्टाफ कमी आहे म्हणून रुग्णाची गैरसोय व्हावी, हे आम्हाला मान्य नाही. एखाद्या विभागात तातडीची गरज भासल्यास, आम्ही तत्काळ इतर ठिकाणच्या कर्मचाऱ्यांचे नियोजन करून रुग्णाला वेळेवर उपचार मिळवून देतो.' रुग्णालयात येणारा प्रत्येक रुग्ण हा उपचाराच्या आशेने येतो. 'आमच्यासाठी कोणताही रुग्ण छोटा किंवा मोठा नसतो. प्रत्येक रुग्णाला सन्मानाने आणि योग्य ती वैद्यकीय सेवा देणे, हेच आमचे परम कर्तव्य आहे. सेवा देताना आम्ही कधीही पक्षपात करत नाही,' असे त्यांनी ठामपणे नमूद केले. त्यांच्या या शिस्तप्रिय आणि सेवाभावी वृत्तीमुळे रुग्णालयीन व्यवस्थापनात मोठे सहकार्य मिळत आहे.

### आई आणि आजीकडून मिळाला 'सेवेचा वारसा'

♦ ग्रेसी ऑगस्टिन यांच्या या समर्पित कार्याचे मूळ त्यांच्या कुटुंबात आहे. त्यांनी आपल्या यशाचे आणि प्रेरणेचे सर्व श्रेय आपल्या आई आणि आजीला दिले आहे. त्यांच्याकडून मिळालेल्या संस्कारांमुळेच आज त्या समाजसेवेच्या या पवित्र क्षेत्रात खंबीरपणे उभ्या आहेत. महिला दिनानिमित्त तरुण मुलींना संदेश देताना त्या म्हणाल्या की, 'आजच्या काळात मुलींनी स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी नर्सिंग क्षेत्राकडे गांभीर्याने पाहावे. हे केवळ एक करियर नसून, समाजाची सेवा करण्याची एक मोठी संधी आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध असून, आत्मविश्वासाने मुलींनी याकडे वळावे.' समाजात महिलांची भूमिका दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असून, ग्रेसी ऑगस्टिन यांच्यासारख्या रणरागिणींमुळे आरोग्य व्यवस्थेचा कणा अधिक भक्कम होत आहे, हे नक्की !

# महिला दिन विशेष

# न्यायव्यवस्थेतील रणरागिणी

### ♦ उपाध्यक्ष शितल गवई यांचा यशाचा 'वकिली' मंत्र !



**अकोला :** 'कायदा आणि न्यायव्यवस्थेची क्षेत्रे आता केवळ पुरुषांची मक्तेदारी राहिलेली नाहीत. आजच्या काळात मुली कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत आणि वकिलीसारख्या जबाबदारीच्या क्षेत्रातही त्या आपल्या मेहनतीच्या जोरावर यशाची उत्तुंग शिखरे सर करू शकतात,' असा वङ्कानिर्धार अकोला बार असोसिएशनच्या उपाध्यक्ष ॲड. शितलताई गवई यांनी व्यक्त केला. जागतिक महिला दिनानिमित्त 'आर आर सी न्यूज' शी संवाद साधताना त्यांनी महिला वकील आणि कायदा क्षेत्रातील आव्हानांवर प्रकाश टाकला.

वकिली क्षेत्रातील आपल्या अनुभवांचे गाठोडे उलगडताना शितलताई म्हणाल्या की, 'वकिली हा प्रवास केवळ संघर्षाचाच नाही, तर सातत्यपूर्ण मेहनतीचा आहे. या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करणे आणि अनेक वर्षे टिकून राहणे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.' त्यांनी या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी तीन महत्त्वाच्या सूत्रांचा उल्लेख केला. सर्वसामान्य महिलांना देखील कायद्याचे अद्ययावत ज्ञान असणे अनिवार्य आहे. तर त्या त्यांच्यावरचा अन्यायाचा प्रतिकार करु शकतील. कोर्टातील प्रदीर्घ लढायांसाठी संयम हाच खरा दागिना आहे. पक्षकारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक वृत्ती असणे आवश्यक आहे.


### न्यायव्यवस्थेत महिलांचे वाढते वर्चस्व

♦ आज अकोला न्यायालयासह देशातील सर्वच न्यायालयांमध्ये महिला वकील अतिशय प्रभावीपणे काम करत आहेत. 'अनेक महिला वकील आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजात सकारात्मक बदल घडवून आणत आहेत. न्यायव्यवस्थेतील हे महिलांचे योगदान लोकशाही बळकट करण्यासाठी मोलाचे ठरत आहे,' असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

### 'तरुणींनी आत्मविश्वासाने पुढे या !'

♦ महिला दिनाच्या निमित्ताने त्यांनी तरुण मुलींना मोलाचा सल्ला दिला. 'मुलींनी केवळ शिक्षण घेऊन थांबता कामा नये, तर आत्मविश्वासाने न्यायव्यवस्थेत यावे. समाजात अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले योगदान द्यावे,' असे आवाहन त्यांनी केले. अकोला बार असोसिएशनच्या माध्यमातून वकिलांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या आणि महिलांसाठी प्रेरणास्थान ठरलेल्या शितलताई गवई यांची ही विशेष मुलाखत अकोल्यातील कायदेतज्ज्ञांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

# अकोल्याच्या मातीतून जागतिक रोबोटिक्सपर्यंत झेप



**अकोला :** जेव्हा जिद्द आणि तंत्रज्ञानाची सांगड घातली जाते, तेव्हा अकोल्यासारख्या शहरातूनही जागतिक स्तरावर ठसा उमटवता येतो, हे 'के आय टी एस इन्स्पायर इंजिनिअरिंग' च्या संचालिका काजल राजवैद्य यांनी सिद्ध करून दाखवले आहे. गेल्या दहा वर्षांपासून रोबोटिक्सच्या प्रगत क्षेत्रात त्या केवळ कामच करत नाहीत, तर अकोल्याचे नाव सातासमुद्रापार पोहोचवत आहेत.

रोबोटिक्स हे क्षेत्र अत्यंत क्लिष्ट आणि आव्हानात्मक मानले जाते. मात्र, काजल मॅम यांनी या क्षेत्रात अशा प्रकारे प्रभुत्व मिळवले की, त्यांनी तयार केलेले रोबोट आज केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही आपली चुणूक दाखवत आहेत. अकोल्यात बसून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान विकसित करणे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.काजल राजवैद्य यांचे कार्य केवळ रोबोट बनवण्यापुरते मर्यादित नाही. त्यांनी संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची गोडी निर्माण करत आहेत.प्रगत रोबोटिक्सचे बारकावे त्या विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या भाषेत शिकवतात. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष रोबोट कसा बनवायचा याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण त्या वर्गांमधून देतात.अकोल्यातील तरुणांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करून शहराला 'प्रगतिशील टेक-हब' बनवणे हे त्यांचे स्वप्न आहे.

### नव्या युगाच्या महिलांसाठी प्रेरणास्त्रोत

♦ तंत्रज्ञान हे केवळ पुरुषांची मक्तेदारी नसून, महिला या क्षेत्रात क्रांती घडवू शकतात, याचा जिवंत आदर्श म्हणजे काजल राजवैद्य. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज अनेक तरुण तंत्रज्ञानाच्या नव्या वाटा चोखाळत आहेत. भविष्यातील 'डिजिटल इंडिया' आणि 'मेक इन इंडिया'मध्ये अकोल्याचा वाटा मोठा असावा, यासाठी त्या अहोरात्र कष्ट घेत आहेत.

### बदलता अकोला, उजळते भविष्य

♦ आजच्या धावपळीच्या आणि आधुनिक युगात काजल राजवैद्य या अनेक महिला आणि विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ ठरत आहेत. त्यांच्या या कार्यामुळे अकोल्यातील शैक्षणिक आणि तांत्रिक वातावरणात मोठी सकारात्मकता निर्माण झाली आहे.

# 'तेरे सर का आंचल खूब जच रहा है'.... 'अगर इसे तुम परचम बना लेती तो खूब अच्छा होता'!



**अकोला :** या शब्दात महिला दिनाचा सुंदर संदेश शहरातील प्रसिद्ध साहित्यिक कवयित्री व प्राध्यापक शारदा बियाणी यांनी दिला. शक्ती, साहस, दया, ममता अशा अनेक गुणांनी महिला परिपूर्ण असते आज असे कुठलेच क्षेत्र नाही जिथे महिलांचा वावर दिसून येत नाही सर्व क्षेत्रात आज महिलांनी आपले प्रभुत्व निर्माण केले आहे असे म्हणतात की महिलाच महिलेची शत्रू असते परंतु आता या सर्व गोष्टी दूर सारून आपल्या क्षमतांना उजागर करायचे झाल्यास महिलांनी समाजाला योगदान देण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे 'उड़ो खुलकर जिओ खुलकर' लेकिन संस्कारो के साथ अशा शब्दात सौ शारदा बियाणी यांनी महिलांना महिला दिनाबाबत संदेश दिला मागील २८ वर्षांपासून प्राध्यापक शारदा बियाणे शिक्षा क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देत आहेत इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत जो अभ्यासक्रम तयार केला जातो त्या मंडळाच्या त्या सदस्य आहेत. त्यांनी आतापर्यंत शहरातील अनेक उत्तमोत्तम विद्यार्थी घडविले आहेत

# देवरी येथील स्केच आयकॉन कांचन वाघोडे



**अकोट :** अकोट तालुक्यातील देवरी येथील माजी जि. प. अध्यक्षा सौ. संध्याताई वाघोडे व खारपाणपट्टा शेती तज्ञ हरिभाऊ वाघोडे यांची कन्या कांचन ही गुणी, एम.एस.सी. ?ग्री बायो उच्चविद्याविभूषित कन्या. चित्रकलेच्या आवडीतून ती पेन्सिल स्केच चित्रे रेखाटू लागली आणि बघता बघता तिचे पेन्सिल स्केच एवढे प्रसिध्द झाले की त्यांना विदेशातून मागणी येऊ लागली. चित्रांमध्ये जिवंतपणा ओतण्याचे कौशल्य तिच्या बोटामध्ये आहे. तिने काढलेली चित्रे जणू काही भाव प्रदर्शित करतात आपल्याशी संवाद साधतात असा भास तिचे चित्रं पाहतांना येतो. फावल्या वेळेत छंद जोपासण्यासाठी तिने अनेक पेन्सिल स्केच रेखाटले व ते आपल्या नातेवाईकांना व मित्रमंडळीना पाठविले तसेच सोशल मीडियावर टाकले आणि अल्पावधीतच ते पेन्सिल स्केच प्रसिद्ध झाले व अनेकांनी तिच्याकडून पेन्सिल स्केच काढून घेतली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात त्याप्रमाणे आपण एक कला जरी अंगी जोपासली तरी जीवनात आपण यशस्वी होऊ शकतो यावर माझा विश्वास असल्याचे तिने सांगितले. वडील हरिभाऊ वाघोडे व आई माजी जि. प.अध्यक्षा संध्याताई वाघोडे यांनी सुद्धा आपल्या या गुणी लेकीच्या छंदाला प्रोत्साहन दिले.

# राज्यस्तरीय 'साहित्यिक काव्यरत्न' पुरस्काराने पद्मिनी खोडके (देशमुख) सन्मानित!



**कुटासा :** नागपूर येथील लोकप्रिय कवयित्री पद्मिनी खोडके यांना जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अहिल्या नगर येथे (अहमदनगर) 'साहित्यिक काव्यरत्न' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या अकोला येथील साहित्यिक डॉ. ज. पां. खोडके यांच्या सुकन्या आहेत. श्रूतीताई बत्तीन, अर्चनाताई देवकते आणि समितीच्या वतीने त्यांची २०२६ च्या 'साहित्यिक काव्यरत्न' या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. अहिल्या नगर येथील कॉलेजमध्ये त्यांना हा पुरस्कार मुंबईच्या शिवसेना नेत्या स्वातीताई हिवरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला महाराष्ट्राची हिरकणी अनिता ताई गुजर, स्मिता धुमाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. हिंदू संस्कृतीची जोपासना हे या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य होते. यापूर्वी पद्मिनी खोडके यांना पुणे येथे 'अभंगवाणी', उत्कृष्ट काव्यलेखनाकरीता पुरस्कार, उषाताई घुगे पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी साहित्यक्षेत्रातील सर्व पुरस्कार आपले प्रेरणास्थान असलेले वडील डॉ. ज. पां. खोडके यांना अर्पित केले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK